सुसंवाद

दिवाळी अंक २०२२

चित्तपावन आठवले परिवार वार्तापत्र

संपादक

वर्षा जोशी-आठवले



सहसंपादक

सतीश आठवले

मुखपृष्ठ व अंकातील सर्व पेंटिंग्ज – श्रीरंग आठवले

चित्पावन आठवले फाऊंडेशन

कार्यकारी मंडळ

अनिल महादेव आठवले, अध्यक्ष

श्रीकांत गोपाळ आठवले, उपाध्यक्ष

यशश्री सुयोग आठवले, सचिव

खासगी वितरणासाठी

लेखांमधील मते संबंधित लेखकांची आहेत. संपादक मंडळ मंडळ त्या मतांशी सहमत असेलच असे नाही.

अनुक्रमणिका

संपादकीय..५

एका सायकल प्रवासाची गोष्ट

- सतीश गजानन आठवले.. ६

शेतकरी म्हणजे नक्की कोण?

- समीर आठवले...१२

पहाटेचे ऋतुरंग

- सारंग सुधीर आठवले... १५

व्यवसायासाठी काय हवं?

- विद्याधर गणेश आठवले..१८

'ती' चं आत्मभान

- वर्षा जोशी-आठवले... २१

बाकी

- प्रचिती आठवले... २४

रिअर व्ह्यू

- नचिकेत सतीश आठवले.. २५

नवरात्र

- सुलभा श्रीकांत आठवले... २७

माझे ऑस्ट्रेलियन अनुभव

- शुभा संजय आठवले.. २८

पारंपरिक पंचामृत, अभिनय पाककृती

- उमा सतीश आठवले... ३१

फणसाचे सांदण, पातोळे

- मेधा आठवले.. ३२

आयुर्वेदातील गणित
- डॉ.संयुक्ता आठवले-गोखले.. ३३

नामी शक्कल
- नीता आठवले-गोडबोले.. ३७

सृजनरंग
- शुभदा आठवले-मोघे.. ३८

शांतीकुंज हरिद्वार
- संजीवनी मनोहर आठवले.. ३९

नागाव संमेलन माहिती
- श्रीकांत आठवले... ४३

संपादकीय

सुसंवादच्या सर्व वाचकांना दीपावलीच्या हार्दिक शुभेच्छा! चित्पावन आठवले फाऊंडेशनच्या वार्तापत्राचा हा पहिला दिवाळी अंक आपल्यासमोर ठेवताना मनस्वी आनंद होत आहे. सुसंवाद त्रैमासिकाच्या आजवरच्या दोन्ही अंकांना आपण सर्वांनी उत्तम प्रतिसाद दिलात त्याबद्दल धन्यवाद.

गेली दोन वर्ष दिवाळीसाठी भेटीगाठी, खाणंपिणं, लोकांना प्रत्यक्ष भेटणं यात खंड पडला असला तरी आपल्या चित्पावन आठवले परिवाराच्या व्हॉट्सअप ग्रुपमुळे आणि दर महिन्याला होणाऱ्या ऑनलाईन सांस्कृतिक कार्यक्रमांमुळे सर्वांनाच भेटीचा थोडासा का होईना आनंद मिळाला. शिवाय आठवले परिवारात असलेल्या विविध क्षेत्रातील मान्यवर व्यक्तींची त्यांच्या कामाचीही यातून ओळख झाली. एरवी आपल्या व्हॉट्सअप ग्रुपवर चालणाऱ्या चर्चा, विविध विषयांवरचं लेखन केवळ तेवढ्यावरच मर्यादीत राहू नये, ते अधिकाधिक लोकांपर्यंत पोहोचावं, आपल्या कामातलं चांगलं काही वाचकांना सांगून त्यांनाही आनंद द्यावा, नवं काहीतरी सांगावं म्हणून या दिवाळी अंकाचे नियोजन.

वाचकांना विविध विषय एकाच ठिकाणी वाचायला मिळावेत यासाठी यावेळी काही विषयांची निवड केली होती. त्यानुसार या अंकात नैसर्गिक शेतीसाठी काम करणारे समीर आठवले यांचे शेतीविषयक विचार, आयुर्वेद आणि गणित या लेखातून आयुर्वेदात गणिताचा वापर कसा झाला आहे हा डॉ.संयुक्ता आठवले गोखले यांचा लेख आहे. हेही वाचता येईल. व्यवसाय कसा करावा, कोणता करावा याविषयी विद्याधर आठवले यांचा लेख नवीन व्यावसायिकांसाठी उत्तम मार्गदर्शक ठरेल. काही तरूणांनी मिळून केलेल्या सायकल प्रवासाची रंजक गोष्ट आहे. याशिवाय ललित लेख, कविता, कथाही आहेत. काही पारंपरिक पाककृतीही तुम्हाला वाचायला मिळतील.

चित्पावन आठवले परिवारातील सदस्यांनी आपली प्रतिभा जोपासावी, लिहितं व्हावं, वाचावं असं आम्हांला वाटतं. त्यामुळे अधिकाधिक सदस्यांनी त्रैमासिक तसंच या दिवाळी अंकाचा लाभ घ्यावा. स्वतः लिहावं आणि इतरांनाही लिहितं करावं.

हा अंक वाचून आपणही काहीतरी वेगळं करावं, अशी प्रेरणा सगळ्यांना मिळो आणि ही दिवाळी आनंददायी होवो ही सदिच्छा !

- **वर्षा जोशी-आठवले**

  संपादक

एका सायकल प्रवासाची गोष्ट

पूर्वतयारी

साल १९६८. आमची काका गॅंग इंजिनिअरिंगच्या चौथ्या वर्षात (इंटिग्रेटेड कोर्स). परीक्षा संपल्यावर सायकल ट्रिप काढायची ठरले. नेहेमीचे १० शिलेदार. भर मे महिन्याच्या उन्हाळ्यात सायकल ट्रिप. घरच्यांनी व इतर मित्रांनी वेड्यात काढले. वेडेपणा करण्याचेच ते वय मग कोणालाही न जुमानता ट्रिप ठरली. कुठे? साधारण १०० मैलाच्या आतबाहेर हे नक्की होते. तसं नागपुरात सायकलनेच फिरायचो. आधीही सायकलने भंडारा, नवेगाव बांध, वर्ध्याच्यापुढे एका मित्राच्या गावी हुरडा पार्टीसाठी, काटोल अशा ट्रिप झाल्याचं होत्या. जायचंच तर थंड हवेच्या ठिकाणी जाऊ असे ठरले. जवळची थंड हवेची दोनच ठिकाणे माहीत. एक चिखलदरा व दुसरे पचमढी. पचमढी दूर म्हणून निकालात निघाले व चिखलदरा फायनल. परतवाड्यापर्यंत सायकलने व पुढे चिखलदऱ्याला बसने.

प्रश्न राहण्याचा होता. चिखलदऱ्याला MTDC ची कॉटेजेस होती म्हणून पत्र पाठवले. उत्तर नाही. तसंच निघायचं ठरलं. सर्वांच्या सायकली बऱ्याच वापरलेल्या, फक्त नागपुरात फिरण्यास योग्य. पण जाण्याआधी नीट दुरूस्त्या करून घेऊ व पंक्चरचे सामान बरोबर ठेवू असे ठरले. (नवीन सायकली ही चैन परवडणारी नव्हती.)

कपडे, अंतर्वस्त्रे, एक सतरंजी ज्यात सर्व सामान बांधायचे, टॉवेल, अंगाचा व कपड्याचा साबण, टूथपेस्ट, बँडेज व थोडी औषधे (वडील मेडिकल रिप्रेझेन्टेटीव्ह असल्याने औषधे फुकट), प्रत्येकाने कोरडा खाण्याचा एक पदार्थ, असे सामान सायकलच्या कॅरिअरला बांधलं जाईल इतकंच घ्यायचं ठरलं. दोन दिवस जाणे, दोन येणे व ५-६ दिवस चिखलदरा असे ८ ते १० दिवसाची ट्रिप. पूर्वी फेल्ट कापडाने गुंडाळलेली टिनाची बाटली मिळायची ती पाण्यासाठी.

सगळं ठरलं. आता निघायचा दिवस. आमची परीक्षा ३० एप्रिलकडे आटोपली. १० मे ला निघायचं ठरलं. ऊन वाढू लागलं होतं. पण उत्साह जबरदस्त. तयारी सुरू झाली. सायकली overhauling साठी दिल्या. इतर सामानाची जुळवाजुळव सुरू झाली. उन्हाळ्याचे दिवस म्हणून पांढरे टीशर्ट, टेरेलीनच्या पॅंटी (धुतल्या की ताबडतोब वाळणार) घेतल्या. प्रत्येकी साधारण रु.१०० घ्यायचे ठरले. (सर्वानाच मेरिट स्कॉलरशिप असल्याने प्रश्न नव्हता.) अगदीच अडचण आल्यास अमरावतीच्या दोन मेडिकल स्टोअरचे पत्ते वडलांनी दिले होते. इथंपर्यंत सर्व मस्त व उत्साहात झाले.

इथेच नाट लागायला सुरवात झाली. १० पैकी ५ गळले. आणखी एखादा गळला तर ट्रिप रद्द होण्याची भीती होती. ८ तारखेला सायकल आणायला गेलो. सायकलवाल्या रामशरणने एकदम बढिया झाली आहे सांगितलं. पण घरी घेऊन येत असतानाच चेन तुटली. झाले! परत रामशरण, परत बढिया. मग मात्र सुखरूप घरी. ९ तारखेला सुभ्या काणे, विज्या गोसावी, किशा मोघे, अशोक भागवत व अस्मादिक भेटून तयारीची खातरजमा करून घेतली. कडक उन्हामुळे उन्हाळी लागण्याची शक्यता विचारात घेऊन अल्क सिट्रॉनची बाटली आणून ठेवली. दुसऱ्या दिवशी सुभ्याकडे शंकरनगरला सकाळी ५.३० वाजता जमायचे ठरवून आपापल्या घरी गेलो.

दिवस पहिला

ठरल्याप्रमाणे सगळे सुभ्याकडे जमू लागले. पण शेवटचा खेळाडू येईपर्यन्त् ७ वाजले. सुभ्याकडे चहा व नंतर थोडा नाश्ता. निघेनिघेतो ७.३० वाजलेच. ऊन् चांगलच वाढू लागलं होतं. ‘बजरंगबली की जय’ असे म्हणून सायकलवर टांग मारली व प्रवास सुरू झाला.

नागपूर अमरावती रोड आताइतका ऐसपैस् नव्हता. डांबरी जरी असला तरी अनेक चढऊतार्, गावं रस्त्यापासून आत, खाचखळगे, फक्त दुहेरी रस्ता, उन्हाळ्यात डांबर वितळलेले, टपऱ्यांची सोय नाही अशी परिस्थिती. नागपूर परतवाडा अंतर साधारण १२० मैल्. त्या उन्हात एका दिवसात ते अंतर पार करणे शक्य नव्हते. त्यामुळे नागपूर तळेगाव पहिल्या दिवशी व तळेगाव परतवाडा दुसरे दिवशी असे ठरले होते. सकाळी ११ पर्यंत व सायंकाळी ५ नंतर प्रवास करायचा. तासाला १२-१३ मैल प्रवास करता येईल असे वाटले होते. प्रत्यक्षात मात्र ७ ते ८ मैल या वेगाने प्रवास झाला. शंकरनगर, सिमेंट रोड, रामनगर, व एल. आय. टी. समोरील तो सुप्रसिद्ध चढाव. वाडी येईपर्यंत दमछाक. तरी बरं, सुरुवात होती पण नंतर होणाऱ्या हालांची ती झलक होती.

रेश हाऊस, तळेगाव - डावीकडून किश्या मोघे, सतीश आठवले, अशोक भागवत व सुभाष काणे. फोटो - विजय गोसावी

११.३० वाजता कोंढाळीचे रेस्ट हाऊस. वॉचमनने व्हांड्यात सतरंजी घालून दिली. ३० मैलाचा प्रवास ४ तास. मध्ये सावली पाहून थांबणे, पाणी पिणे यात थोडा वेळ गेला. तेथेच घरून आणलेला जेवणाचा डबा उघडून सामुदायिक जेवण. गरम झळा येतच होत्या. त्यामुळे झोप येणे शक्य नव्हते. पण विश्रांती मिळाली. दुपारी वॉचमनने चहा दिला. पाणी भरून घेऊन ४ लाच कोंढाळी सोडले व तळेगावकडे निघालो. ऊन उतरत होत व प्रवासही बरा होत होता. वाटलं साधारण ८ वाजे पर्यंत तळेगाव गाठू. कुठलीही गोष्ट सरळ होणे नशिबात नव्हते. कारंजा २ मैल असतांनाच अशोकची (की किशाची?) सायकल पंक्चर. मग सायकल हातात धरून दुसऱ्या सायकलवर डबल सीट (कॅरिअरचे सामान पंक्चर सायकलला बांधून) कारंजा गाठले. हमरस्त्यावर फक्त तीन चार टपरीवजा हॉटेल पण पंक्चरचे दुकान गावात दीड मैल आत. मग सायकली हॉटेलवर ठेऊन व पंक्चर सायकल हातात घेऊन गावात. दुरुस्त करून येईपर्यंत तासभर गेला. निघालो तळेगाव कडे. अंधार पडायला लागला होता. पण उन्हाचा त्रास नव्हता. तळेगावच्या आधी घाट. अंधार मी म्हणत होता, सायकलचे दिवे समोरचे दिसण्यापेक्षा समोरच्याला दिसावे असे, अमरावतीकडून येणारी ट्रकची वाहतूक, त्यामुळे सगळे एका लायनीत ब्रेक दाबून हळूहळू घाट उतरत होतो. एरवी रामरक्षा न म्हणणारे रामरक्षा म्हणत घाट पार केला. रात्री ९ च्या सुमारास तळेगाव गाठले. रात्र कुठे काढायची हा प्रश्न होताच. PWD रेस्ट हाऊसला गेलो. जागा नाही असे त्या खानसाम्याने सांगितले. आमच्या सुदैवाने तेथे थांबलेले एक सरकारी अधिकारी बाहेर बसले होते. त्यांनी आम्हाला बोलावून विचारले. आम्ही इंजिनिअरिंगचे विद्यार्थी सायकलने चिखलदरा येथे निघालो आहोत हे समजल्यावर त्यांनी त्या खानसाम्यास आमची व्हांड्यात व्यवस्था करण्यास सांगितले. त्यांच्या बरोबर थोड्या गप्पा मारून बाहेरून जेवून आलो व रात्री व्हांड्यात का होईना पण सोय झाली म्हणून परमेश्वराचे आभार मानून झोपी गेलो.

दिवस दुसरा

सकाळी लवकरच जाग आली. डासांनी त्रास दिला तरी थकल्यामुळे झोप चांगली झाली. चहा व नाश्त्याची व्यवस्था झाली होती. त्यामुळे आन्हिके उरकून बाहेर पटांगणात बसलो. पहिले फोटो सेशन तिथे झाले. नंतरच्या

स्थलांतरांत फोटो मात्र गहाळ झाले. असो. साधारण ७.३०च्या सुमारास तळेगांव सोडले व अमरावतीच्या दिशेने निघालो. आदल्या दिवशीच्या उन्हाने प्रताप दाखवावयास सुरुवात केली. उन्हाळीचा त्रास सुरू झाला. ऊन वाढू लागले तसे त्रास जास्तच वाढला. मग थांबायचे पाणी प्यायचे व पुढे जायचे. अल्क सिट्रॉन घेतले. त्यात तीच सायकल परत पंक्चर. परत तीच सर्कस. वेळ जात होता. प्रवास संपत नव्हता. मोझरीच्या जवळ परत पंक्चर. सुदैवाने तेथे सायकलचे दुकान होते. त्याने ट्युब बदलण्यास सांगितले. पण थांबण्यास वेळ नव्हता. १२.३० च्या सुमारास अमरावतीस पोचलो तेव्हा अवस्था वाईट होती. चित्रा टॉकीज जवळ लॉजमध्ये एक खोली संध्याकाळ पर्यंत भाड्याने घेतली. एका मेवाडी हॉटेलमध्ये जेवलो. सायकलची टयुब बदलली व खोलीवर विश्रांतीसाठी आलो. अमरावतीचा उकाडा नागपूर पेक्षाही जबर. पंख्याचा वारा देखील गरम. संध्याकाळीच निघायचं तर या उकाड्यापेक्षा सिनेमा पाहू अशी टूम निघाली. ३ ते ६ चा शो. मनोजकुमार व साधना यांचा अनिता हा सिनेमा होता. चित्रपटाशी काही घेणे देणे नव्हतेच. खोलीपेक्षा थंड.

६ वाजता खोली सोडली. सामान घेऊन निघालो परतवाडयाच्या दिशेने. सुदैवाने उन्हाळीचा त्रास थांबला होता व हवेतील गर्मीही कमी झाली होती. परतवाडा येईपर्यंत किमान १० वाजले असते. त्यावेळी कोणाकडे जाण्याचा प्रश्नच नव्हता. तेव्हा सावकाश जाऊ व एस. टी. स्टँडवर रात्र काढू असे ठरले. पहिला मुक्काम वडगाव. दुपारी जेवण चांगले झाले होते म्हणून रात्री जेवणाचा प्रश्न नव्हता. रात्र असल्याने तसाही प्रवास हळूहळूच होत होता. कुठे चहा पी, तर कुठे फरसाण खा. सुदैवाने सायकलचा प्रश्न आला नाही. मजल दरमजल (खरं म्हणजे त्या प्रवासाला हा शब्द वापरणे हा मराठीचा अपमान आहे.) करीत रात्री १२ च्या सुमारास परतवाडा बसस्टँडला पोचलो. स्टँड कसला, मोकळे पटांगणच. एका बाजूस चहा नाश्त्याच्या टपऱ्या. सर्वत्र सामसूम. अंधार. एका बंद टपरी शेजारी सायकली लावल्या. बाहेर पाण्याचा रांजण दिसला. पाणी पिण्याचे होते की नाही समजले नाही पण इलाज नव्हता. पाणी पिऊन सतरंज्या त्या मैदानात पसरल्या व निद्रादेवीची आराधना करू लागलो. झोप लागणे शक्य नव्हते. एकतर अशी सवय नाही व सायकलीची भीती. त्यामुळे थोडी झोप, थोड्या गप्पा अशी रात्र पार पडली. सकाळी ५.३० च्या सुमारास उजाडू लागले. सकाळी रांजणाजवळ पाणी घेण्यासाठी गेलो तर आजूबाजूला खरकटे सांडले होते. हे पाणी आपण प्यायलो हे आठवून पोटात ढवळल्या सारखे झाले. सर्व आटपेपर्यंत टपरीवाला आला. त्याने आमची चौकशी केली. चहा व थोडा नाश्ता घेऊन सायकली कीशाच्या नातलगाकडे ठेवण्यास गेलो. स्टँडवर येऊन सामानासकट ८ च्या पहिल्या चिखलदरा बसची वाट पहात बसलो.

चिखलदरा मुक्काम व पर्यटन

सकाळी ८ची बस अर्धातास उशीरा आली. प्रवास फक्त २५ मैलाचा पण घाटातून. साधारण दीड तास लागतो. बस साधीच लालपरी. आमच्या अशोकला बस लागते व घाट वळणाचा रस्ता असल्याने प्रश्नच होता. पण सर्वच चढावाचा रस्ता त्यामुळे बसचा वेग कमी. त्यामुळे निभावले व काही त्रास न होता चिखलदरा बस स्टँडवर पोचलो. साधारण ११ वाजले. पायी चालत MTDC रीसोर्टला पोचलो. पक्के आरक्षण नव्हते. तेथील मेस पाशीच ऑफिस होते. एक कॉटेज रिकामे होते. ते मिळाले. त्यावेळी फारशा सोयी नव्हत्या. नाश्ता व जेवण मेस मध्ये मिळे. एक छोटा हॉल, एक मधली खोली, छोटेखानी किचन व मागे संडास बाथरुम. समोर मोठे सामाईक पटांगण व मागे छोटे परस. आम्ही सगळेच संटे त्यामुळे फार अडणार नव्हतेच.

गावं लहान व त्यामुळे त्यावेळी गावात फार सोयी नव्हत्या. अंघोळ वगैरे उरकून, कपडे धुवायचे राहिले होते ते उरकून, मेसमध्ये जेवण केले. पहिलाच दिवस, सायकलिंग करून थकलेलो असल्याने त्या दिवशी आराम करायचा असेच ठरले होते. निवासाचा प्रश्न सुटल्याने बिनधास्त होतो. मेस मध्ये पाहण्याची ठिकाणे कोणती ही माहिती घेतली व रोज

एक ठिकाण पहायचे, मनसोक्त भटकायचे. बस मधून येतांना जंगलाचा अंदाज आलाच होता. झोप, विश्रांती व पत्ते, सोबत सिगारेट व क्वचित दारू (सभ्य भाषेत ड्रिंक्स). रात्री कॉटेज सोडून बाहेर जाऊ नका ही सूचना मिळालीच होती कारण जंगली श्वापदे येण्याची शक्यता होती. संध्याकाळी सुद्धा अंधार पडायच्या आत जंगलातून बाहेर वस्तीत यायचे. त्यावेळी मुळात वस्ती कमी त्यात वर्दळही कमी, त्यामुळे तरस, कोल्हे वगैरे प्राणी येत असत अशी बोलवा होती. आमचाही मुख्य फिरणे हाच उद्देश होता. प्रेक्षणीय स्थळे (?) पहायची कारण परत गेल्यावर " काय काय पाहिले?", ह्या प्रश्नांना उत्तरे द्यायची होती. प्रेक्षणीय फारसे काही नव्हते व स्थळे पहायची वेळ यायची होती.

पण बरी वाईट माणसे मात्र भेटली संपूर्ण ट्रीप मध्ये. पर्यटनाचा उद्देशच मुळी माणसांचा अभ्यास असा असतो. स्थळे आपापल्या जागी असतातच. आपण चांगले वागलो तर इतरही चांगले वागतात ह्या उक्तीचा प्रत्यय येत होता. पण काही ठिकाणी वाईटही अनुभव आले.असाच एक सुंदर अनुभव मी व सुभाष सायकलने जवळच (साधारण ५ मैल दूर) वैराटला गेलो असताना आला. वैराट ही पूर्वीची विराट राजाची राजधानी. पांडव अज्ञातवासात इथे राहिले होते. चिखलदरा पेक्षा उंच असे हे ठिकाण. जाण्याचा रस्ता पायवाटेसारखा. आता वैराट ला काहीही नाही. छोटी वस्ती व एक देवीचे देऊळ. रस्त्यात छोट्या छोट्या वस्त्या. सायकलने जातांना जाम तहान लागली होती. खूप दमछाक झाली होती. रस्त्यात एका वस्तीवर पाणी मागितले पण त्यांनी नाही सांगितले. कसेबसे वैराट ला पोचलो. एका झोपडी समोर एक बाई बसली होती. पाणी मागितले. एक एक भांडे पाणी दिले. एव्हढेच मिळेल म्हणून सांगितले. त्यांना पाणी खोल दरीत उतरून आणावे लागते म्हणून जपून वापरतात. पैसे देऊ केले तर नाही म्हणाली. तुम्ही दुरून आला पण द्यायला काही नाही म्हणाली. गलबलून आले. पाण्याचा अनिर्बंध वापर करणारे आम्ही कुठे व भांडेभर पाण्यासाठी फिरणारे हे लोक. हे पाहिले की आपली आपल्यालाच कीव येऊ लागते.

तस पाहिले तर पौराणिक महत्व सोडलं तर वैराटला पाहण्यासारख काही नाही. ना रस्ता, ना पाणी. पण त्या उंच टेकडीवर उभे राहिल्यावर येणारी थंड वाऱ्याची झुळूक (हे शब्द लिहिताना कसे काव्यमय वाटतात पण खर म्हणजे जोरदार वारा) , उतरणीला लागलेला सूर्य, खाली दिसणारी दरीतील गर्द झाडी व त्यात लपलेली गावे, सर्व श्रम, ऊन, तहान विसरायला होते. आम्ही ना कवी, ना चित्रकार, ना शब्दप्रभू. त्यामुळे त्यावेळची मनाची स्थिती सांगणे अवघड. पण तो आनंद अवर्णनीय होता. वैराटला जाण्या साठी सायकली चिखलदरयात भाड्याने घेतल्या होत्या. त्यांची अवस्था आमच्या सायकली पेक्षाही वाईट. जातांना चढ अगदी दम काढणारा तर येताना उतार. जीव मुठीत व ब्रेक हातात. धुळीने अंग माखलेले. टेकडीवरील तो आनंदाचा क्षण सोडल्यास बाकी दुःख च. आमचे इतर तिघे आले नव्हते. खरं तर ते सुटले पण आल्यावर आम्ही असे काही वर्णन केले की चिखलदरा सोडण्याच्या दिवशी ते तीघेही तेथे जाऊन आले. त्यात अशोकने नेलेल्या सायकलचे टायर फूटले. हातात सायकल घेऊन अर्धा मैल चालत आले. आल्यावर शिव्यांची लाखोली. फक्त मारायचे बाकी ठेवले. ऐसे दोस्त से तो दुष्मन अच्छे.

चिखलदरा हे थंड हवेचे ठिकाण पण दुपारी ऊन जाणवायचेच. त्या मुळे फिरणे सकाळी किंवा दुपारी ४ नंतर. त्यात ७ च्या आंत घरात. दुपारी झोप किंवा पत्ते. फक्त गाविलगड ला गेलो ते ऐन दुपारी. त्या दिवशी वातावरण ढगाळ होतं मग उन्हाचा त्रास नाही जाणवला. गडाची तटबंदी सोडली तर आंत सर्वच मोडलेले. एक तलाव आहे पण पाणी घाण. सर्व दूर झाडी.

"फार आतवर जाऊ नका. रात्री वाघ सुद्धा येतो. ४-५ वाजेच्या आंत बाहेर या." इति वॉचमन.

किल्ल्याच्या आत गेलो. भटकत भटकत किती आत गेलो समजले नाही. ४ वाजत आले होते. परत जाण्यासाठी निघालो तोच खालून कुठूनतरी डरकाळी सारखा आवाज आला. घाबरून धूम पळालो पण कुठे जात होतो कळले

नाही. सुदैवाने १५ मिनिटात प्रवेश दाराजवळ आलो. ती १५ मिनिटे मात्र गर्भगळीत अवस्थेत गेली. काही प्रसंग विसरता येत नाहीत त्यापैकी हा एक.

चिखलदरयात भीमकुंड म्हणून एक जागा आहे. तीन बाजूंनी सरळसोट कडे व एका बाजूने कुंडाकडे जाण्या साठी उतरण. उतरणीलगतचा कड्याचा भाग थोडा कमी म्हणजे १५-१६ फूट. पण चढण्यास अवघड. कुंडापाशी उतरून गेलो. भीमाने किचकाचा वध इथे केला अशी आख्यायिका. कुंड कीर्ती खोल यांचा अंदाज बांधणे शक्य नव्हते. मी सहज म्हणालो, "हा कडा चढून जाणे अशक्य. पाय निसटला तर थेट कुंडात." मी असे म्हणतो तोपर्यंत अशोक कडा चढायला सुरुवात. ओरडण्यात अर्थ नव्हता. तो ऐकणारयातला नव्हता व लक्ष विचलीत होऊन पडण्याची भिंती. पण तो कडा सुखरुप चढला व आमचा जीव भांड्यात पडला.

एका रात्री लघवी लागली म्हणून उठलो व मागचा दरवाजा उघडणार तोच काही आवाज आला म्हणून खिडकीतून पाहिले. कुंपणापाशी दोन तरस दिसले चंद्र प्रकाशात. सर्वांना उठवले व दाखवले. ५ मिनिटात ते तेथून गेले. मी मात्र १५-२० मिनिटांनी बाहेर गेलो.

असे काही प्रसंग सोडल्यास बाकी दिवस विविध ठिकाणे उदा. पांचबोल, सनसेट पॉईंट, ई., पाहण्यात व भटकाण्यात गेले. १७ तारखेस सकाळी परत जायचे होते पण वर सांगितल्याप्रमाणे बाकी तिघे सकाळी वैराटला गेले होते व त्यांना परत यायला दुपारचे दोन वाजले. नंतर जेवण, आवरा आवर करुन निघता निघता ५ वाजले. चिखलदरास राम राम करुन बसमधे बसलो परतीच्या प्रवासासाठी.

परतीचा प्रवास

चिखलदऱ्याला रामराम करुन परतीच्या प्रवासाला बस मध्ये बसलो. तारीख होती १८मे. बसमध्ये बसण्याआगोदर जेवण झाले असल्यामुळे पोट गच्च भरले होते. सुदैवाने बसमध्ये फार गर्दी नव्हती. घाट उतरायचा असल्याने आम्हास वाटले होते की बस फार वेगाने जाणार नाही. पण ड्रायव्हर भलताच जिद्दीचा निघाला. गाडीने जो वेग पकडला की प्रत्येक वळणावर (अगदी हेअर पिन वळणावर सुद्धा) गाडी दोन्ही बाजूला कलत होती. अशोकला बस लागते व त्यात जेवण झालेले. अगदी ड्रायव्हरच्या मागील सीटवर बसलेला. त्याला उलटी होईल असे वाटल्यावर आम्ही मित्र व जवळ बसलेले प्रवासी ताबडतोब दुसरीकडे बसलो. उलटी झालीच. परतवाडयास पोचल्यावर वाहकाला थोडे पैसे देऊन साफ करून घेण्यास सांगितले. ५०व्या मिनिटास आम्ही परवाड्यास होतो.

रात्रीचा मुक्काम त्याच पटांगणात केला. सकाळी उठून सायकली घेतल्या. मुक्तागिरी हे जैनांचे एक तीर्थक्षेत्र. बरीच मंदिरे एका टेकडीवर आहेत. परतवाडायाहून साधारण १५ मैल दूर. त्याच टपरीवाल्याकडून पुरी भाजीचा डबा घेतला. एक दारूची क्वार्टर घेतली होती. मुक्तागिरीचा प्रवास दमछाक करणारा असला तरी कोणतेही विघ्न न येता पार पडला. सायकली खाली ठेऊन वरती गेलो. एकाच मंदिर पाहिले. दर्शन घेतले. उन्हामुळे फरशा तापलेल्या. पाय ठेवू देत नव्हते. त्या उन्हात परत जाणे शक्य नव्हते. तेव्हा तिथे खाण्या पिण्याची सोय नव्हती. इथे खोल्या होत्या पण साध्या. एक खोली तीन चार तासासाठी घेतली. अट म्हणजे मांसाहार व दारू, सिगारेट वर्ज्य. खोली बंद करून थोडी दारू व जेवण केले. तसेच पसरलो सारवलेल्या जमिनीवर. ४.३० वाजता परत निघालो. हा प्रवास मात्र सुखाचा झाला. ६ वाजता परतवाडयास परतलो व अर्ध्या तासात नागपूरच्या दिशेने निघालो.

यावेळेस प्रवास रात्रीचा करायचा होता. एक कारण म्हणजे जवळचे पैसे संपत आले होते त्यामुळे हॉटेल मुक्काम किंवा जेवण शक्य नव्हते. घरीच जायचे असल्याने पोचण्याची खूप घाई नव्हती व उन्हाचा त्रासही वाचला असता. चंद्राचा प्रकाश बऱ्यापैकी होता. अमरावतीस न थांबता थेट तळेगाव गाठायचे होते. रहदारी ही कमी होती. त्यामुळे जरा

आरामात प्रवास करत होतो. सायकलने दगा देऊ नये अशीच प्रार्थना करत रस्ता कापत होतो. वडगावला थोडे खाऊन पहाटे ३ च्या आसपास तळेगाव गाठले. तेथील एस टी स्टँड वर सामसूम होती. सायकली तेथेच ठेऊन बाकड्यावर झोपलो. आळीपाळीने सायकलींवर लक्ष ठेवत होतो.

२० मे. अस्मादिकांचा जन्मदिवस. सकाळी ६वाजता आवरून तेथेच तोंड धुणे, शौच वगैरे आटोपले. एका टपरीवर चहा बिस्कीट घेऊन निघालो. ऊन चढण्या अगोदर कोंढाळी गाठायचे होती व विशेष म्हणजे यावेळी घाट चढायचा होता. येताना याच टप्प्यात खूप त्रास झाला होता. पण सकाळची वेळ, रहदारी कमी व सायकल नो त्रास. त्यामुळे १० वाजताच कोंढाळीस पोचलो. त्याच रेस्ट हाऊसला थांबलो. बाहेर जाऊन थोडे खाऊन आलो व ऊन उतरायची वाट पहात, पत्ते खेळत बसलो. गेल्या १० दिवसाचा प्रचंड शीण आला होता. अंग दुखत होत. पण आता घरी जायची ओढ लागली होती. त्यामुळे ३.३० वाजताच ऊन असूनही पुढे निघालो. दिवस मोठा होता व जरा जोरातच पायदळ मारत होतो. LIT ची इमारत दिसली व हर्षवायु तेव्हढा व्हायचा राहिला. शंकरनगर चौकात एकमेकांचा निरोप घेतला व ७ वाजता घरी पोचलो. घरचे वाटच पहात होते असे लिहिणे जरा अतिशयोक्तीचे होईल पण सर्वांना भेटून बरे वाटले. अंघोळ (२ दिवसात केलीच नव्हती) करून आलो. आईने औक्षण केले (वाढदिवस म्हणून हो), मस्त जेवलो. वडील MR असल्याने औषधे होतीच. एक Novalgin घेऊन झोपलो.

ट्रीप चालू असताना अपेक्षेपेक्षा जास्त त्रास झाला व झक मारली अन् वारी केली या म्हणीचा वारंवार प्रत्यय येत होता. पण पंढरीच्या दर्शनाने जसे वारीचे सार्थक होते तसेच दुसरे दिवशी झाले. सगळ्यांना, वर्णन करून सांगताना आपण काही अद्भुत केले याचा आनंद जाणवत होता व तो पुढे बरेच दिवस टिकून राहिला.

त्यानंतर आजतागायत दुसरी सायकल ट्रीप केली नाही पण हीच ट्रीप इतकी विलक्षण होती की लिहायला लागलो तसे सारे काही आताच घडत आहे असे वाटत होते. तपशीलात थोडा फार गोंधळ असेलही पण जे घडले ते लिहिले. लिहून मला समाधान मिळाले वाचणाऱ्यालाही ते मिळो. ही आमच्या प्रवासाची कहाणी साठा उत्तरी संपूर्ण.

- **सतीश गजानन आठवले, पुणे**
  मोबाईल क्र. - 9850845756

शेतकरी म्हणजे नक्की कोण?

भारत हा शेती प्रधान देश आहे!

हे वाक्य आपण कायम वाचतो, ऐकतो, बोलतो. पण खरंच, ह्या वाक्याचा अर्थ आपल्याला नक्की कळला आहे का? सर्वसाधारण समजुती प्रमाणे ह्या वाक्याचा अर्थ असा लावला जातो की भारतातील बहुसंख्य लोक आपल्या उपजिविकेसाठी शेती वर अवलंबून आहेत. मुळात हा अर्थ लावणे हाच सगळ्यात मोठा गैरसमजूतीचा भाग आहे.

पूर्वीच्या काळी कुटुंबातील एखादी व्यक्ती राजाच्या दरबारी किंवा सेनेत कामाला असायची, दुसरी व्यक्ती एखादा छोटा उद्योग करायची (कुंभार, लोहार इत्यादी) आणि सर्व कुटुंब शेती करायचे. म्हणजेच अनादी काळापासून शेती हे कधी उपजीविकेचे साधन म्हणून बघितले गेले नव्हते तर त्या कडे एक गरज म्हणून बघितले जायचे. भारतातील ८०% जनता शेती आणि शेतीपूरक व्यवसायावर अवलंबून आहे. ह्याचा खरा अर्थ असा होतो, भारतातील ८०% लोकं अन्नासाठी इतर कोणावरही अवलंबून नाहीत. अनेक लोकांनी शेतीला व्यवसाय बनवला आणि हे करताना ते शेतकऱ्याला व्यावसायिक बनवू शकले नाही आणि म्हणून आज शेतकऱ्याची परिस्थिती बिघडली.

अन्न, वस्त्र आणि निवारा ह्या माणसाच्या मूलभूत गरजा आहेत. जेव्हा आपण ह्या तीन गोष्टींना गरज मानतो तेव्हा हे पुरवणाऱ्या माणसाकडे फक्त व्यावसायिक दृष्टिकोनातून बघून चालणार नाही! आपल्या नशिबाने शेतकऱ्याने अजून ह्या ३ गोष्टींकडे व्यावसायिक दृष्टिकोनातून बघितले नाही, म्हणून आपण अजून अन्न खाऊ शकत आहोत आणि कपडे घालू शकत आहोत. घराची अवस्था काय झाली आहे हे तुम्ही अनुभवत आहात कारण आता बांधकाम व्यावसायिक तुमची ही गरज भागवत आहेत. तेव्हा विचार करा शेतकरी व्यावसायिक झाला तर काय होईल?

आज अन्न, वस्त्र आणि निवारा ह्या गरजा ज्याच्या मार्फत पूर्ण होतात तो गरीबच राहिला. अन्न पिकवणारा गरीब मात्र अन्न शिजवून जेऊ घालणारा कोट्याधीश झाला. कापूस निर्माण करणारा गरीब मात्र कापसाला रंग लावून कपडे बनवणारा श्रीमंत झाला. तीच बाब निवाऱ्याची, जमीन मालक गरीब राहिला मात्र इमारती बांधणारा पैसे कमावू लागला.

ही जर सत्य परिस्थिती असेल तर ह्या सगळ्या प्रश्नाकडे वेगळ्या दृष्टिकोनातून बघणे गरजेचे आहे. जरा ग्रामीण भारताचा आणि भारतीय जीवन पद्धतीचा अभ्यास केला तर सहज लक्षात येईल चूक कशात आहे ती. पूर्वी

भारतात पंचक्रोशीत सगळा व्यवहार चालायचा म्हणजे साधारण ५ गावांचा एक गट असे. बारा बलुतेदार असायचे जे समाजाच्या विविध गरजा पुरवायचे. आता ह्या बारा बलुतेदारांत शेतकरी नाही ह्याचाच अर्थ अन्न आणि शेतकरी ह्याकडे अनादी काळापासून वेगळ्या धाटणीतून बघितले गेले आहे. आपण मात्र अन्नाला एखाद्या वस्तू स्वरूपात आणून ठेवले आणि मागणी / पुरवठा ह्या व्याख्येत बसवून टाकले. प्राचीन भारतातील बाजारपेठ ही वस्तुविनिमय स्वरूपात म्हणजेच वस्तूंच्या बदल्यात वस्तू अश्या स्वरूपात चालत असे. चलनाच्या बदल्यात वस्तू ही संकल्पना प्रचलित नव्हती. त्यामुळे गरजे पुरती खरेदी ही व्यवस्था होती. कुठेही साठेबाजी करून अधिक जास्त आर्थिक नफा मिळावा ह्या विचारसरणीचा उदय झाला नव्हता. वाहतूक व्यवस्था मर्यादित असल्यामुळे जास्त काळ टिकू शकेल असा शेतमाल बाहेरच्या बाजारपेठेत पाठवला जायचा. जेव्हा पासून जागतिक बाजारपेठ ही संकल्पना उदयास आली तेव्हा पासून मागणी आणि पुरवठा ह्याची गणिते बदलू लागली. ३००-४०० वर्षांपूर्वी पूर्ण वेळ शेतकरी कमी होते कारण सर्वच जण शेती करायचे. शेती ही अन्नाची गरज म्हणून केली जायची.

मूळ समस्या तेव्हा निर्माण झाली जेव्हा लोकांनी शेती करणे सोडून पूर्णवेळ नोकरी किंवा व्यवसाय करायला सुरुवात केली. ह्या घडामोडीत इतर सर्व जण पैसे कमवण्याच्या मागे लागले मात्र त्या बदलत जाणाऱ्या व्यवस्थेत त्यांनी शेतकऱ्याला सामील करून नाही घेतलं.

कुठल्याही व्यवसायात मालाच्या विक्रीची किंमत तो माल विकणारा ठरवतो. ग्राहकाकडे सौदा ठरवायची मुभा असली तरी एका ठराविक किंमती खाली कुठलाच व्यावसायिक त्याचे उत्पादन विकत नाही. मात्र शेतमालासाठी ती मुभा शेतकऱ्याकडे ठेवलीच नाही, सर्व अधिकार फक्त ग्राहकाकडे गेले. भारताने जागतिक बाजारपेठ १९९१ साली सर्वांसाठी खुली केली मात्र शेतकऱ्याला ती संधी मिळायला २०१६ साल उजाडले. तरीही त्याला अजूनही खूप निर्बंधात अडकवून ठेवले आहे.

आता तुम्हाला हे समजले असेल की शेतकऱ्याला व्यावसायिक होण्याची संधी न देता शेतमाल विकणारा मात्र व्यावसायिक बनून ह्या सगळ्याचा फायदा उठवत होता. आता थोडं अजून खोलात जाऊ. कुठलीही नोकरी नोकरदार स्वीकारणाऱ्याच्या आधी त्याला पगार, कामाची वेळ आणि साप्ताहिक/वार्षिक सुट्टी ह्याची माहिती मिळते. त्या सर्व बाबी त्याला पटल्या तरच तो ती नोकरी स्वीकारतो. त्याच प्रमाणे व्यवसायात व्यवहार करण्याआधी किती किमतीला हा व्यवहार होणार आहे, किती दिवसांनी ह्याचे पैसे मिळणार आहेत, हे सर्व आधी ठरलेले असते.

आता सद्य स्थितीतील शेतकऱ्याची परिस्थिती समजवून घेऊ. पेरणी पासून कापणी होऊन बाजारात जाई पर्यंत शेतकऱ्याला किती उत्पादन होईल? त्याला किती परतावा मिळेल? ह्याची कुठलीच कल्पना नसते. त्यात जर तो माल नाशिवंत असेल तर ही व्यथा अधिकच कठीण असते.

आता तुम्हाला ह्याचीही जाणीव झाली असेल की किती चुकीच्या पद्धतीने शेती आणि शेतकरी हा विषय हाताळला गेला आहे. आता पुढे जाऊन जाणून घेऊ की शेतकऱ्याच्या समस्या सोडवणायच्या नादात ज्या उपाययोजना आणल्या गेल्या त्यासुद्धा किती चुकीच्या आहेत आणि विषयाचा गांभीर्याने अभ्यास न करता उथळ उपाययोजना आखून त्यातून समाधान शोधण्याचा प्रयत्न होत आहे.

सगळ्यात पहिले कर्जमाफीवर बोलू. कारण प्रत्येकाच्या मनात कर्ज माफी दिल्यावर शेतकऱ्याला उपकृत केल्याची भूमिका ठाण मांडून बसते. मग ते सरकार सरकार असो, बँक कर्मचारी असो, शासकीय यंत्रणा असो, शेतकरी नेता असो किंवा सर्वसामान्य माणूस. कर्ज माफी आधी शेतकरी कर्जबाजारी का होतो ते माहित करून घेणे गरजेचे आहे. पूर्वी शेतकरी सर्व अन्न, धान्य, भाजीपाला तसेच इतर गोष्टी स्वतः पिकवायचा आणि स्वतः खायचा. जे जास्त होईल तेच बाहेर विकून त्या बदल्यात दुसऱ्या गरजेच्या गोष्टी घ्यायच्या. ह्याचा अर्थ जास्त शेतमाल निघाला तरच बाकीच्या गोष्टीसाठी तरतूद केली जायची. अन्न सोडले तर कुठल्याच गरजेसाठी रोज पैसा खर्च करावा लागत नाही. मात्र जेव्हा अन्नच विकत घ्यावे लागते तेव्हा पैश्याची रोज गरज निर्माण होते. शेतीतून रोज पैसे मिळणे कठीण. अगदी सगळ्यात जलद पीक म्हणजे भाजी पाला. भाजी पाला घेतला तरी त्यासाठी ५०-६० दिवस थांबणे गरजेचे आहे आणि ते सुद्धा रोजच्या रोज उत्पादन नाही निघू शकत. त्यात धान्य असेल तर ४-५ महिने वाट बघणे आले. अगदी बारमाही पाणी असलेला प्रदेश असला तरी वर्षाकाठी ३ ते ४ वेळेला एक रक्कमी उत्पन्न येईल. अर्थात १२ माही पाणी मिळणे कठीणच. नवीन समाज बदलामुळे खर्च तर रोज चालू आहे मात्र उत्पन्न ठरविक वेळेलाच मिळते. मग गरज ते मिळकत हे अंतर भरून काढण्यासाठी शेतकरी कर्जाच्या कचाट्यात अडकत जातो. त्यात जर पाऊस चांगला नाही झाला, उत्पादन चांगले येऊन भाव नाही मिळाला तर परिस्थिती अजून भीषण होत जाते. कर्ज तर घेतले पण त्याची परत फेड सुद्धा दर महिना, म्हणजे कर्ज ज्या दुष्ट चक्रातून सुटण्यासाठी काढले त्याच चक्रात कर्जाने अजून अडकवले. मग अगदी दरवर्षी कर्ज माफी केली तरी मूळ मुद्दा सुटणार नाही. आणि तो मुद्दाच अजून कोणी मांडत नाही तो मुद्दा म्हणजे शाश्वत आर्थिक मिळकत. कुठल्याही व्यवसायाला तारक किंवा मारक त्यातून मिळणार नफा किंवा होणारी घट नसते, तर व्यवसायात किती रोकड प्रवाहात येते त्यावर त्याचे आयुष्य अवलंबून असते. (थोडक्यात Cashflow ठरवतो व्यवसायाचे आयुष्य.) असे अनेक व्यवसाय आहेत जे तोट्यात असून सुद्धा वर्षानुवर्षे चालू राहतात कारण दररोज त्या व्यापारात व्यवहार होतो आणि दररोज रोख प्रवाह येतो. नदी जो पर्यंत वाहत असते तोपर्यंत तिच्यात असलेली घाण कधीच बाहेर येत नाही मात्र थांबली की त्याचे डबके होते आणि मग बाष्पीभवन होऊन पाणी उडून जाऊन फक्त घाण राहते. अगदी तसेच काहीसे शेती आणि शेतकऱ्याचे झाले आहे.

तेव्हा लोकहो, थोडा विचार करा. बाकीच्या गोष्टींची चर्चा पुढील भागात.

- **समीर आठवले**

मोबाईल क्र. – 9320032765

वेबसाईट - www.shopforchange.ngo

पहाटेचे ऋतुरंग

चैत्र महिन्यातील पहाट. नेहमीप्रमाणे पक्ष्यांच्या किलबिलाटाने मला जाग आली. तोंड धुवून चहाचा कप घेऊन मी झोपाळ्यावर येऊन बसलो. समोर गर्द झाडीतून सूर्यदेव डोकावू लागले होते. पहाटेच्या वेळी कोवळ्या सूर्यप्रकाशात पक्ष्यांचे आवाज ऐकत ध्यान लावून बसणे यासारखे सुख नाही. मन एकदम ताजेतवाने होते. गेल्याच वर्षी आम्ही जुन्या घराचे नूतनीकरण केले. अस्सल कोकणी शोभेल असे चिऱ्याचे टुमदार घर. घराच्या वर गच्ची, त्यावर कौलाचे छप्पर, गच्चीवर झोपाळा आणि त्यावर बसून निसर्ग निरीक्षणाचा मनमुराद आनंद घेता येतो. पुढच्या बाजूला अंगण आणि त्याला लागून पुढे छोटीशी परसबाग आहे. बागेत उंबर, बेल, पेरू तसेच प्राजक्त, अनंत, जास्वंदी, एक्जोरा, बहावा, चाफा, तगर ही फुलझाडे आहेत. यावर्षी आम्ही नारळ आणि केळी लावली आहेत. त्याच्या बाजूला शिवण, आंबा, फणस, बेहडा, भेंडी अशी बरीच गर्द वनराई पसरली आहे. त्यामुळे विविध जातीचे पक्षी इकडे आकर्षित होतात. घराच्या मागच्या बाजूलाही छोटेसे अंगण आहे. तिकडे जुनी पाण्याची दगडी द्रोण आहे. त्याबाजूला लिंबी चे छोटेसे झाड आहे. बांधावर गुलाब, कुंद, लिली पसरली आहे. अंगणाच्या मागे एक दोन घर सोडली की दूरवर शेत दिसू लागते.

त्या दिवशी नेहमीप्रमाणे पहाटेची सुरुवात दयाळ पक्षाच्या सुरेल शीळेने झाली. लालबुड्या बुलबुल जोडी एकमेकांना आवाज देत होती. पाठोपाठ नारद बुलबुल जोडी अनंतावर येऊन बसली. हळूहळू बाजूच्या वनराईतून रानभाईंचा सुरेल आवाज येऊ लागला. आता सुर्य नारायणांनी पूर्ण दर्शन दिले होते, त्यांच्या कोवळ्या किरणांनी पानाफुलांना हळुवार स्पर्श केला होता आणि अशातच बुरखाधारी हळद्या 'पोक्या गो' आवाज करत फांदीवर येऊन बसला. सकाळच्या कोवळ्या किरणांमध्ये त्याचा पिवळा रंग अधिकच आकर्षक दिसत होता. तो उडून गेल्यावर त्याच फांदीवर जरा वेळाने नारंगी गोमेट येऊन बसला. शेजारच्या नारळी वर सोनपाठी सुतार टकटक आवाज करीत होता. मधूनच खारुताईचा किवकिवाट चालू होता. अशी मैफिल ऐकण्यात कसा वेळ गेला कळलेच नाही. त्यानंतर पहाटे उठून अशी मैफिल ऐकण्याची सवयच लागली. नंतर मी दररोज पहाटे उठून गच्चीवर येऊन बसत असे. जसा वैशाख महिना संपत आला तसा उन्हाळा वाढू लागला आंबे, फणस पिकायला सुरुवात झाली. मोगऱ्याच्या वेलीला फुले धरू लागली. पहाटेच्या वेळी याचा सुगंध हवेत दरवळत असे. दयाळ, बुलबुल यांच्याबरोबर कोकिळेचे हि मंजुळ गीत कानावर पडत असे. मधूनच रंगीबेरंगी नवरंग आणि नारंगी कस्तुर आपल्या विशेष आवाजात साद देत असत. तर कधी तांबट पक्षाच्या 'गूटर्रगू' नि जाग येत असे. मागच्या बाजूला शेताच्या बांधावर कौशी चे झाड आहे. वसंत ऋतु मध्ये पानगळ होते आणि याला सुंदर केशरी रंगाची फुले येतात. त्यावर भांगपाडी मैना, कोतवाल, सूर्यपक्षी ताव मारत असत. त्याच्याच मागे बकुळीचे झाड आहे. त्याच्या सुगंधी फुलांचा सडा जमिनीवर पडलेला असतो. गावातील महिलावर्ग या बकुळीखाली फुलं वेचायला येत असतात.

उन्हाळ्यामध्ये सुद्धा आपल्या आजूबाजूला असा रंगाचा सोहळा बघण्यासारखा असतो. याच ऋतूत करवंद, अळू, तोरणं या रानमेव्याचा आस्वाद घेता येतो. पण हे सगळे अनुभवायला रानवाटा पालथ्या घालायला पाहिजेत. शहराच्या झगमगाटात बंद खोलीत एअर कंडिशनर मध्ये बसून ही मजा अनुभवता नाही येणार. जसजसा महिना सरू लागला उन्हाळ्याचा कडाका चांगलाच वाढला होता, पावसाचे वेध सगळ्यांनाच लागले होते.

अशातच एके दिवशी पहाटे उठून अंगणात आलो आणि पाहतो तर आकाशात ढगांनी गर्दी केली होती, गडगडाट होत होता, पहिल्या पावसाची आतुरतेने वाट पाहत होतो आणि अशातच पावश्याच्या 'पेरते व्हा' या आवाजाने मन उत्साहीत झाले. आता नक्की पावसाला सुरुवात होणार या विचाराने ही बरे वाटले आणि खरोखर दोन-तीन दिवसात पावसाने पूर्ण परिसर झोडपून काढला. पावसाच्या हजेरीने माणसांप्रमाणे सर्व पशुपक्ष्यांना ही आनंद झाला. उन्हाळ्याच्या अखेरीस काही दिवस माझ्या पहाटेच्या निरीक्षणाला खंड पडला होता, परंतु पावसाच्या आगमनाने मी परत लवकर उठून गच्चीवर येऊन बसत असे. दहा बारा दिवसातच पावसाने सगळे चित्र बदलले. वैशाखवणव्यात तापलेल्या जमिनी हिरव्यागार दिसू लागल्या होत्या. भातशेती च्या कामाला जोरदार सुरुवात झाली होती. 'पेरते व्हा' च्या गजराने पहाटेची सुरुवात होई.

डोंगरावरून मोरांचा आवाज कानावर येत असे. अनेक छोट्या पक्ष्यांची घरटी करण्यासाठी लगबग चालू झाली. सुभग, नीलिमा, पांढऱ्या पाठीची मनोली, ठिपकेदार मनोली, राखी वटवट्या, नीलमणि, चष्मेवाला, शिंपी पक्षी हे सर्वजण आपापले घरटे सजवण्यात मग्न झाले. या दिवसात पाहुण्या चातक पक्ष्याला बघण्याची आतुरता असे.

बाजूच्या वनराई मध्ये शामा पक्ष्याचे गाणे ऐकू येई. कारुण्य कोकिळा, काळ्या डोक्याचा कुहूआ, पट्टेदार कोकीळा हे सक्रिय होते. मी जमेल तसे लवकर उठून रानात भटकंती करायला जात असे. म्हणता म्हणता श्रावण आला, पहाटेच्या वेळी समोरच्या बागेत प्राजक्ताचा सडा पडलेला असे. ऊन पावसाच्या खेळामुळे रानवाटांवर अनेक रंगीबिरंगी रानफुले दिसू लागली. पेरते व्हा चा गजर करणारा पावश्या हळूहळू शांत होऊ लागला. पावसाचा जोरही कमी झाला होता. काळटोप कस्तुर, धनेश, होला, कावळे, सातभाई, पोपट यांचे नियमित दर्शन होतं असे. कधी कधी भारद्वाजाच्या 'हुप हुप' आवाजाने उजाडत असे. नवरंगाचा आवाजही आता क्वचितच येत होता. कदाचित तो पिल्लांसमवेत आपला गाशा गुंडाळून दूरच्या प्रवासासाठी तयारी करत असावा.

भाद्रपद उलटून गेला, जसे जसे दसरा दिवाळी उलटून गेली तशी हवेत गारवा येऊ लागला. यादरम्यान पहाटेची वेळ धुक्यामध्ये हरवलेली असते त्यामुळे एकंदरीतच थोडं उशिरा उजाडते. परंतु या महिन्यात पहाटेच्या वेळी धुक्यातून एका सुंदर पक्ष्याची शीळ ऐकू येते त्याचे नाव पर्वत कस्तुर. अशाच एके दिवशी पहाटे मी जरा कंटाळा करतच उठलो होतो. पानांवरून दवबिंदू पडत होते. त्याच्या टप टप आवाज कानावर येत होता आणि हळुवार नाजुक अशी पर्वत कस्तुराची शीळ कानावर पडली. ज्यासाठी अथक प्रयत्न करून उठलो होतो ते ऐकायला मिळाल्यावर झोप उडून गेली. अर्थातच धुक्यामध्ये दिसणे शक्य नव्हते पण त्याचा नुसता आवाज पण आनंद देणारा होता.

नंतर घरामागच्या अंगणामध्ये शेकोटी पेटवून बसलो शेतामधून जंगली पिंगळ्याचे आवाज येत होते. जसे जसे ऊन डोकावू लागले नेहमीप्रमाणे पक्ष्यांनी हजेरी लावली इतर वेळेला कमी सक्रिय असणारे पाचू कवडा, हरोली, हरिद्रपक्षी, नाचरा सकाळच्या वेळेत घरासमोरील बागेत दिसून आले. इतर वेळी सहज न दिसणारा सुंदर असा पाचू कवडा या दिवसात अगदी घरासमोर येत होता. या महिन्यात अजून एक आकर्षण म्हणजे अनेक स्थलांतरित पक्ष्यांचे आगमन. शिशिर ऋतूच्या अखेरीस जसजशी थंडी सरू लागली तसे आंब्याच्या झाडांना मोहोर दिसायला लागला. हळूहळू पानगळीला सुरुवात झाली आणि परत एकदा वसंत ऋतुच्या आगमनाने उन्हाळ्याची चाहूल लागली.

अधून मधून ऑफिसच्या कामानिमित्त मी पुण्याला येऊन जाऊन करत होतो, परंतू माझं प्रामुख्याने काम सॉफ्टवेअर मध्ये असल्याने मला 'work from home' च होते. पण हा पूर्ण काळ माझ्यासाठी सत्कारणी लागला असे म्हटले तरी चालेल कारण मला माझी आवड जोपासता आली.
हे अनुभव आज-काल शहरातल्या सिमेंटच्या जंगलात मिळणे आता अवघड झाले आहे यासाठी एखाद्या छोट्याशा गावात निसर्गरम्य शांत ठिकाणी जावे आणि या प्रत्येक ऋतूचे सौंदर्य आणि त्यानुसार होणारे बदल अनुभवावे. या सर्व ऋतुचक्रामध्ये पहाटेची वेळ ही विशेष करून मला अवर्णनीय वाटते. निसर्गचक्राप्रमाणे सजीव सृष्टीत होणारे बदल यावेळेत प्रामुख्याने अनुभवता येतात, हे सगळेच इकडे मांडणे खरोखरच अवघड आहे. अजूनही मी जमेल तसे गावाकडे आलो की याची अनुभूती घेतो, सूर्योदया बरोबर उठण्याची एक चांगली सवय लागली आहे.
मंगेश पाडगावकर यांनी लिहिलेल्या ओळींचा खरा अर्थ हे सारे काही अनुभवल्यावरच लागतो.

"सहा ऋतूंचे सहा सोहळे येथे भान हरावे,
या जन्मावर या जगण्यावर शतदा प्रेम करावे"

छायाचित्रे आणि लेखन: सारंग सुधीर आठवले

व्यवसायासाठी काय हवं?

अत्यंत कमी भांडवलात करता येणारा व्यवसाय.

कोणताही व्यवसाय उभारण्यासाठी काही मूलभूत गोष्टींची गरज असते.
१. उत्तम कल्पना (business idea)
२. व्यवसायासाठी योग्य जागा. (office, workshop, shed etc.)
३. व्यवसायासाठी योग्य परिसराची निवड. (area of targeted customers)
४. साधन सामग्री (machines, equipment etc.)
५. मनुष्य बळ उपलब्धता (office staff, technicians, labor etc)
६. व्यावसायिकाचे स्वतःचे आरोग्य, शारीरिक क्षमता, मानसिक क्षमता (physical and mental fitness)
७. कायदेशीर बाबींची पूर्तता (legal compliance)
८. व्यवसायातील धोक्यांची जाणीव (basic knowledge of competition, possibility of money crunch etc.)
९. सेवा किंवा उत्पादनाच्या मागणीतील चढ- उतारांची जाणीव (perception of volatility in demand)
१०. भांडवलाची गरज आणि उभारणी (estimate of capital investment and raising it)

वर दिलेले दहा मुद्दे हे अत्यंत प्राथमिक स्वरुपाचे आहेत. उत्तम व्यवसाय उभारणीसाठी इतर अनेक गुणांची, ज्ञानाची, अनुभवाची,मार्गदर्शनाची गरज असते. त्याचा विचार मी या लेखात करत नाही. कारण फारसे शिक्षण नसल्यामुळे किंवा इतर काही कारणांमुळे चांगली नोकरी न मिळवू शकणाऱ्या तरुणांना स्वतःच्या पायावर उभं राहण्यासाठी मार्गदर्शन करण्याचा या लेखाचा उद्देश आहे.
स्वतःचा व्यवसाय करण्याची इच्छा अनेकांना असते पण व्यावसायिक होण्याची आपली मानसिकता आहे की नाही हे आधी स्वतः पडताळून पहावे आणि मगच कोणताही व्यवसाय करण्याचा विचार करावा. आपल्याला बऱ्यापैकी नोकरी असेल आणि केवळ कुणाचे दोन शब्द ऐकून घ्यायला नको, म्हणून नोकरी ऐवजी व्यवसाय करावा असे वाटत असेल त्यांनी व्यवसाय करण्याच्या भानगडीत अजिबात पडू नये. स्वतःची चूक नसताना सुद्धा विनाकारण अनेकांचे बोल ऐकून घेण्याची तयारी व्यावसायिकाकडे असावी लागते. (customer is always right!) सरकारने अचानक सार्वजनिक सुटी जाहीर केल्यामुळे ज्यांना आनंद होतो त्यांनी आपली व्यवसाय करण्याची मानसिकता नाही असं समजायला हरकत नाही. व्यवसायात अचानक सुटी म्हणजे प्रचंड नुकसान असं समीकरण असतं. हातातलं काम सोडून मॅच पहाणं, सिरियल पहाणं, राजकीय पुढाऱ्यांच्या मागे धावणं, जर आवडत असेल तर त्यांनीही आपली व्यवसाय करण्याची मानसिकता नाही असं समजायला हरकत नाही. हे अशासाठी लिहिलं आहे की अनेक लोक आरंभशूर असतात पण व्यवसाय करण्याची मानसिकता नसल्यामुळे हातातली नोकरी घालवून बसतात आणि व्यवसायातही अपयशी ठरतात. व्यवसाय करणं म्हणजे स्वातंत्र्य नव्हे, नोकराना सुटी घेता येते मालकाला सुटी मिळत नाही!
असो. नमनाला घडाभर तेल ओतल्यानंतर मुख्य विषयाकडे वळतो. वरील सर्व बाबींवर विचार करून ज्यांनी व्यवसाय करण्याचा निर्णय घेतला आहे पण व्यवसायाची मुख्य गरज म्हणजे भांडवल उभारणं शक्य नाही त्यांना मी इथे एक अत्यंत कमी भांडवलाची गरज असलेल्या, कुणालाही करता येण्यासारख्या आणि भरपूर नफा मिळवून देणाऱ्या व्यवसायाची तोंड ओळख करून देत आहे.

सध्याचा जमाना हा सेवा क्षेत्रासाठी उत्तम आहे (service industry) असं माझं वैयक्तिक मत आहे. ते चुकीच्या गृहितकांवर आधारित असू शकतं. मी जो व्यवसाय सुचवत आहे तो सेवा क्षेत्रातील असला तरी तो सध्याच्या जमान्यासाठीच नाही तर कोणत्याही काळात उत्तमच असणार आहे याबद्दल मला तिळमात्र शंका नाही. या व्यवसायात आर्थिक भांडवलापेक्षा विश्वासार्हता महत्त्वाची आहे. आता अधिक उत्सुकता न ताणता स्पष्ट करतो, हा व्यवसाय आहे इमारतीच्या रंगकामाचा! अतिशय क्षुल्लक वाटणारा किंबहुना क्षुद्र वाटणारा हा व्यवसाय भरपूर नफा मिळवून देऊ शकतो ! इथे मी फक्त इमारतीच्या बाह्य रंगकामाचा (exterior painting). चा विचार करत आहे, अंतर्गत रंगकाम आणि तदनुशंगाने येणारी कामे (interior decorating) केल्यास नफा अनेक पटींनी वाढू शकतो पण ते काम जास्त कौशल्याचं असल्यामुळे अननुभवी माणसाने सुरुवातीला तिकडे हात घालण्याचा प्रयत्न करू नये. आणखी एक महत्त्वाचा मुद्दा म्हणजे सुरुवातीला बाह्य रंगकाम करण्याचे काम फक्त सहकारी गृहनिर्माण संस्था किंवा खासगी बंगल्याचेच घ्यावे. बिल्डर्सकडे भरपूर काम (quantity) असते पण तिथे गळेकापू स्पर्धा असल्यामुळे बिल्डर्स रेट पाडून काम देतात आणि काही सन्माननीय अपवाद वगळता, बिल्डर्सकडून झालेल्या कामाचे पैसे वेळेवर मिळतील याची शाश्वती नसते. पेंटरचं खूप भांडवल अडकून पडतं आणि नुकसान होतं. पैसे मिळाले नाहीत म्हणून पुढचं काम बंद केलं तर अडकलेले पैसे कधीच मिळत नाहीत! म्हणजे अडकलेले पैसे सोडविण्यासाठी आणखी काम करत रहाणं आणि आणखी अडकणं हे दुष्टचक्र चालूच रहातं म्हणून हा सावधगिरीचा इशारा!

गृहनिर्माण संस्थेचे काम घेण्यात हा धोका उद्भवत नाही कारण तिथे अगाऊ रक्कम (advance) मागून घेता येतो. देकार (quotation) देताना इमारतीच्या पृष्ठभागाचे क्षेत्रफळ मोजून, प्रति चौरस फूट किंवा चौरस मीटर प्रमाणे दर आकारून, चाळीस टक्के ॲडव्हान्स आणि वीस टक्के प्रत्येक कोट (primer, 1st coat, 2nd coat) झाल्यानंतर देय असे मान्य करून घ्यावे म्हणजे पैसे अडकण्याची शक्यता रहात नाही. सोसायटीकडे पुरेसे पैसे जमा झाल्याशिवाय सोसायटी अशा कामाना हात घालत नाही. खूप कमी भांडवलात हा व्यवसाय सुरू करता येतो. मिळालेल्या चाळीस टक्के रकमेमधे प्राथमिक खर्च म्हणजे परांची बांधणे (scaffolding), प्रायमर खरेदी, साफसफाई आणि लेबर वगैरे सहज भागतात, त्यानंतर वीस टक्के मिळाले की पुढचे खर्च अशा प्रकारे पदराचा एकही पैसा खर्च न करता काम पूर्ण करून नफा पदरात पडतो!

असं असेल तर मग या व्यवसायाला भांडवलाची गरजच नाही का?

असं असू शकत नाही. व्यवसाय कोणताही असला तरी भांडवलाची गरज असतेच फक्त मी सांगितलेल्या पद्धतीने हा व्यवसाय केला तर ती अगदी कमी असते.

Exterior painting मधे इमारतीचा पृष्ठभाग स्वच्छ धुवून काढण्याला अनन्यसाधारण महत्त्व आहे कारण हा तुमच्या रंगकामाचा पाया आहे. पृष्ठभागावर असलेले शेवाळ (algae) बुरशी (fungus) झाडांच्या चिकाचे डाग, पक्षांच्या विष्ठा इत्यादी प्रयत्नपूर्वक घासून, धुवून साफ करावे लागतात. हे काम अत्यंत किचकट आणि कंटाळवाणे असल्यामुळे कामगार या कामात हमखास कामचुकारपणा करतात म्हणून या कामासाठी मशीन वापरणे आवश्यक आहे. त्यासाठी योग्य क्षमतेचा प्रेशर जेट पंप उपयोगी पडतो. असा पोर्टेबल पंप आणि त्यासाठी आवश्यक त्या लांबीची फ्लेक्झिबल केबल या साठी अंदाजे वीस पंचवीस हजार रुपये पुरतील. बस. एवढ्याच भांडवलाची गरज आहे. परांचीसाठी बांबू भाड्याने मिळतात, ते बांधून देणारे वेगळे कंत्राटदार असतात. आपल्या कामगारांना परांची बांधण्याचे प्रशिक्षण देऊन आणि बांबू विकत घेऊन साठवण्याची सोय केली तर बराच खर्च वाचतो, पण सुरुवातीला जम बसेपर्यंत भाड्याने बांबू घेणे सोयीचे पडते.

ह्या धंद्यात कंत्राटदाराची विश्वासार्हता खूप महत्वाची असते कारण बाह्य रंगकाम केल्यानंतर किमान सहा सात वर्षे ते पुन्हा करण्याची वेळ येऊ नये अशी काम करुन घेणाऱ्याची अपेक्षा असते. पण कंत्राटदार प्रायमरच्या

ऐवजी चुना किंवा व्हाईट सिमेंट वापरून आणि रंगामधे मर्यादेपेक्षा जास्त पाणी घालून काम बिघडवतात. तसे न करता सचोटीने काम केले तर बाह्य रंग आठ ते दहा वर्षे चांगला राहू शकतो. त्यासाठी बर्जर, एशियन पेंटस् सारख्या नामांकित कंपन्यांचे उत्तमोत्तम रंग (exterior emulsion pints उपलब्ध आहेत ते व त्याच कंफनीचा त्या रंगासाठी तयार केलेला प्रायमर वापरावा. रंगकामामधे रंगाच्या थराची जाडी (dry film thickness -dft) खूप महत्वाची असते. कंत्राटदार कव्हरेज जास्त मिळून रंग वाचविण्यासाठी त्यात गरजेपेक्षा जास्त पाणी मिसळून पातळ थर देतात तसे केले तर रंगाची प्रत घसरते आणि त्याचं आयुष्यमान कमी होतं. रंगात जास्त पाणी मिसळलं तरी रंग उठावदार दिसतो कारण त्यामध्ये असलेल्या titanium di oxide (Ti O2)आणि इतर fillers मुळे त्याला अपारदर्शकता (opacity) प्राप्त झालेली असते परंतु त्यामध्ये anti-fungal, water resistant, ultra violet resistant वगैरे अनेक महत्त्वाचे घटक मिसळलेले असतात त्यांचं पाण्याबरोबर असलेलं अपेक्षित प्रमाण बिघडल्यामुळे रंग दिसायला चांगला दिसला तरी तो टिकाऊ न राहिल्यामुळे लवकर खराब होतो आणि कंत्राटदाराची बनवाबनवी उघडी पडते आणि नंतर बदनामी झाल्यामुळे कामे मिळत नाहीत. प्रायमरमधे किंवा रंगामधे किती पाणी घालायचं याची सूचना रंगाच्या डब्यावर लिहिलेली असते. त्यापेक्षा एक थेंब सुद्धा पाणी जास्त न घालता प्रायमर आणि रंग वापरला तर दृष्ट लागण्यासारखं काम होईल आणि केवळ तोंडी झालेल्या प्रसिद्धीमुळे सतत कामाचा ओघ सुरू राहील. त्यासाठी रंगाच्या डब्यावर लिहिलेल्या सूचना लक्षपूर्वक वाचून त्यांची काटेकोरपणे अंमलबजावणी केली तर ह्या व्यवसायात कधीही नुकसान होणार नाही आणि तो निरंतर चालू राहील.

हा लेख खास आपल्या आप्तजनांच्या 'सुसंवाद' साठी लिहिलेला आहे. तो कृपया इतरत्र शेअर किंवा फॉरवर्ड करू नये ही नम्र विनंती. आठवले कुटुंबातील किंवा त्यांच्या स्वकियांपैकी कुणाला हा व्यवसाय करण्यात स्वारस्य असल्यास मी अधिक विस्तृत माहिती विनामोबदला देऊ शकेन. दिवाळीच्या सुमारास या व्यवसायाचा सिझन सुरू होतो म्हणून समयोचित लेख लिहिण्याचा प्रयत्न केला आहे.

तुम्ही काय काम करता यावर तुमची कीर्ती किंवा अपकीर्ति अवलंबून नसते, तर करत असलेले काम आपण कसे करतो यावर ती अवलंबून असते.

- **विद्याधर गणेश आठवले, पनवेल**
  मोबाईल क्र. - 9372876193

'ती' चं आत्मभान

2004 साल. अगदी जवळच्या एका मैत्रिणीचं लग्न झालं. काही महिन्यातच तिच्या आईवडिलांकडून मुलीला सासरी नीट नांदवत नसल्याची तक्रार सुरू झाली. तिच्या आईचा दर 2-4 दिवसांनी मला फोन. तू तिच्या घरी जाऊन बघ. तशी मी जायचेही. एकदा तिच्या सासूने ती नवऱ्यासोबत फिरायला गेलीये तू जा सांगितलं. तरीही पाच मिनिटं तिच्या घराबाहेर थांबून, नंतर घरासमोरच्या बसस्टॉपवर थांबून राहिले. दोघं नवरा बायको त्या नंतर पाच मिनिटांनी घरातून बाहेर पडले. याचा अर्थ तिच्या सासूने खोटं सांगून मला वाटेला लावलं होतं. नंतर तिच्या आईसोबत पुण्यातल्या पत्रिका पाहणाऱ्यांही भेटी दिल्या. बाहेरून तिच्या घरावर कोण लक्ष ठेवेल, महिला डिक्टेटिव्ह शोधायला सुरूवात केली. या सगळ्यात तिची आई फक्त गावाहून मला फोन करायची आणि तू शोध, तू कर असं सांगायची. मीही आपली नवीन नवीन जर्नालिझम झालेली, मैत्रिणीला, एका मुलीला असा त्रास होतोय म्हणून सळसळतं रक्त असणारी वगैरे होते. काही दिवसांनी मैत्रीण प्रेग्नंट असल्याचंही समजलं. एकदा माझे एक काका तिच्या सासरच्या गावचेच असल्याचं कळलं. मग त्यांनाही भेटले. सगळं सांगितलं. त्यांनी एकच प्रश्न विचारला, वर्षा, हे सगळं तू करते आहेस. पण समज तिच्या सासरी तिला काही त्रास देत नसतील, आईवडील नक्की काय घडलंय हेही सांगत नाहीयेत. तुलाच सगळीकडे जा बघ, असं सांगताहेत. जर तिला काही त्रास नसेल ती परत यायलाही तयार नसेल आणि या सगळ्या प्रकारेमुळे सासरचे म्हणाले, की तुम्ही घेऊन जा तुमच्या मुलीला तर तिच्या आईवडीलांची तयारी आहे का? एवढंच त्यांना विचार आणि परत ये. तशी तयारी असेल तर काय लागेल ती सगळी मदत मी करेन. झालं! हे ऐकल्यावर मला खरंच प्रश्न पडला काकूंचा. शेवटी त्यांना फोन केला. सरळच विचारलं की काकू, सुलू प्रेग्नंट आहे. जर तिच्या सासरचे म्हणाले की न्या तुमच्या मुलीला परत तर तुम्ही आणणार आहात ना तिला घरी. त्या लगेच म्हणाल्या, आता मूल होणार आहे तर कसं आणायचं. तिला एकटीला आम्ही सांभाळू पण तिच्या बाळाचं काय? ते ऐकूनच मी हादरले. की मुलीला त्रास आहे असं यांना वाटतंय तर मग तिला आहे तसं सांभाळायची काहीच तयारी नाहीये यांची. मी एवढंही म्हटलं की अहो, ती शिकलेली आहे, नोकरी करेलच की. तरीही त्यांची तयारी नव्हती. हे सगळं ऐकून खाडकन माझे डोळे उघडले आणि मी तिथंच थांबले. तिचं लग्न झाल्यापासून तिच्या काळजीने कधीतरी रात्री उडणारी झोप, तिला काय त्रास असेल या विचाराने पडणारी स्वप्नं यामुळे मात्र पुढची कित्येक वर्ष मी मात्र डिस्टर्ब झाले.

अर्थात या प्रसंगातून आयुष्यभराचा धडा मिळाला आणि पुढे माझ्या घरात असं घडलं आणि या मुलीला सासरहून परत आणायची वेळ आली तेव्हा मात्र मी मागे हटले नाही. मैत्रीणीच्या आईचे विचार तेव्हा बदलता आले नाहीत पण एक स्त्री म्हणून नक्कीच या प्रसंगातून माझ्यात थोडं शहाणपण आलं.

तसं याआधी वाईत शाळा-कॉलेजमध्ये असताना मुलगी म्हणून भेदभावाचे अनुभव फारसे वाट्याला आले नव्हते. कारण घरात आणि बाहेर ज्या वर्तुळात वावरत होते तिथलं वातावरण बऱ्यापैकी चांगलं होतं. नाही म्हणायला मी आणि वाईतल्या काहीजणी तेव्हा रूद्र, उदकशांत, उपनिषदं अशी काही वैदिक, धार्मिक स्तोत्रं शिकत होतो. हे सगळं आम्हाला शिकवणारे वेदमूर्ती शंकर अभ्यंकर यांनी वाईतल्या वैदिक कर्मकांड करणाऱ्या ब्राह्मणांच्या विरोधात बंड पुकारून तिथल्या महिला, मुलींना हे सगळं शिकवायला सुरूवात केली होती. त्यामुळे कुणाच्या घरी लघुरूद्र वगैरे करण्यासाठी गेल्यावर तिथं जेव्हा दुसरे गुरूजी मुलींनी हे

म्हणायचं नाही असं म्हणून हाकलून देत तेव्हा हळूहळू त्यांच्याकडे दुर्लक्ष करायलाही आम्ही सर्वचजणी शिकलो. हळूहळू हे शिकणाऱ्या महिला, मुलींची संख्या इतकी वाढली की एकदा कृष्णाबाई उत्सवाआधी सर्व महिला-मुलींचीच संख्या उदकशांत म्हणण्यासाठी मोठी होती.

बाकी वयानुरूप आणि गरजेनुसार घरातली आर्थिक नाही तरी 'कमी तिथं आम्ही' ही जबाबदारी घेतलीच होती. माझं कॉलेजचं शेवटंच वर्ष. 1999 किंवा 2000 साल असावं. आमच्या लाडक्या आजीचं तेव्हा निधन झालं. घरातल्या सगळ्यांसाठी ती एकप्रकारे दैवतच होती. त्याआधी काहीवर्ष आमच्या घरात सगळे बदल होऊ लागले होते. दोघी बहिणी शिकायला पुण्याला गेल्या होत्या. नंतर त्यातल्या दोघींची लग्न झाली. आणि घरं ओकंबोकं झालं. हा बदल पचवणं मात्र मला अत्यंत कठीण झालं. घरातल्या सात माणसांची संख्या अचानक चारवर आली. त्यातच वयोमानानुसार आजारी पडून आजीही गेली. आतातर आजोबा, आई आणि मीच उरलो. हे सहन करणं अत्यंत कठीण, त्यातून आपण आजीचं फार काही करू शकलो नाही ही जाणीव मनाला अत्यंत पोखरायची आणि पुढचे काही महिने सतत रडणं, जेवण न जाणं हे सुरू झालं. हे सगळं थांबलं ते अक्षरशः मोठी बहिण बाळंतपणासाठी आली तेव्हा. तिचं वजन म्हणावं तसं वाढलेलं नव्हतं. मग आमच्या फॅमिली डॉक्टरच्या साथीने तिचं वजन वाढणं, बाळ सुदृढ जन्माला यावं म्हणून प्रयत्न करणं हे शिवधनुष्यचं आम्ही हातात घेतलं होतं. तेव्हा झालं असं की, बेडरिडन आजीचं सगळंच करायला लागत असल्यामुळे आईची तब्येत बिघडली होती. तिला सतत खोकला सुरू होता. आजूबाजूच्या बऱ्याच जणांनी टीबी असेल अशी भीतीही दाखवली होती. त्यामुळे तिला पाचगणीच्या टीबी हॉस्पीटला घेऊन जाणं, औषधं आणणं सुरू झालं. आता औषधं सुरू करायची तर आमच्या इथले वैद्य चितळे मला म्हणाले, ही औषधं सुरू केली की मधे थांबवता येणार नाहीत. आहार वगैरे सगळंच काटेकोर पाळायला लागेल. आणि आईला टीबी नाहीये हे मी खात्रीपूर्वक सांगतो. मी औषध सुरू करतो. तू थांब. त्यांच्या या सांगण्यामुळे आम्ही ती औषधं द्यायची नाहीत असं ठरवलं. नंतर काही महिन्यात आई खडखडीत बरीही झाली. पण तिची तब्येत तोळामासा झाली होतीच. त्यामुळे ती बहिणीचं बाळंतपण कसं करू शकेल हा प्रश्न होताच. त्यामुळे बहिणीच्या खाण्या-पिण्याची, बाळाला सांभाळण्याची सर्व जबाबदारी मला घेणंच भाग होतं. आईही तिला जमेल तितकं सांगायची, शक्य होती ती कामं करायचीच. या सगळ्यातून एकीकडे माझं कॉलेज शिक्षण होतंच. ती गाडीही रूळावरून घसरू द्यायची नव्हती. अर्थातच, या सगळ्या जबाबदाऱ्या माझ्यावर अचानकच आल्या होत्या. त्याआधी आई, आजी सगळं घरातलं, बाहेरचं बघायच्या. बहिणी नोकरी करू लागल्या आणि त्यांनी नंतर घराची पूर्णच जबाबदारी घेतली. मी शेंडेफळ त्यामुळे अर्थातच तोवर काहीच जबाबदारी, काळजी हे काही नव्हतंच. वेळ आली तेव्हा कळलं की बहिणींचं, आई आणि आजीचं बघून आपण बरंच काही शिकलो आहोत आणि कुठल्याही परिस्थितीत पुन्हा उभं राहू शकतो.

वाईसारख्या छोट्या गावात राहून चौघी मुली असून आजूबाजूला किंवा आमच्या घरातही कधी मुली म्हणून कुठंच डावललं गेल्याची वागणूक मिळाली नाही. तांदळात खडे लागतात तसे नाही म्हणायला काही लोक

किंवा नातेवाईक आमच्या आईला, चौघी मुलीच कसं होणार? असं म्हणायचे. जिथं अशी वागणूक मिळाली तिथं दुर्लक्ष करून आपण पुढे जात राहायचं हे आजी, आई आणि बहिणींच्या वागण्यातून मी शिकले.
दुर्दैव म्हणजे पुण्यात आल्यानंतर पत्रकारितेत शिरल्यानंतर हा दुजाभाव मात्र अनुभवायला मिळाला. माझ्या मुलींना मात्र असे अनुभव मिळू नयेत याबाबत कायमच सजग राहायचा प्रयत्न करत असते. मागे एकदा घरी काहीजणांचा खेळ सुरू होता. लेकीला नवा नवा डॉक्टर सेट आणला होता. कोण डॉक्टर, कोण नर्स होणार यावरून भांडणं सुरू होती. एक मुलगा म्हणाला, मुली कधी डॉक्टर असतात का? मीच डॉक्टर. तेव्हा मधे पडून मला माझी बहिण डॉक्टर, सर्जन असल्याचं आणि आणखी कितीतरी अशा महिला डॉक्टरांची नावं सांगायला लागली.
नुकतंच गणपती उत्सवात जेव्हा मुलींना सोसायटीत लेझीम खेळायला बोलावलं. तेव्हा एकीने मला आणि लेकीला विचारलं का येत नाहीस तेव्हा मोठी लेक म्हणाली, इथं दरवर्षी मुलींनाच लेझीम देतात. ढोल वाजवायला कायमच मुलं असतात. तुम्ही ढोल देत नाही म्हणून येत नाही. पुढच्यावर्षी ढोल मिळणार असेल तर येईन. पहिल्या प्रसंगावेळी मुलगी बऱ्यापैकी लहान होती म्हणून मला बोलावं लागलं. पण आता मात्र नववीत शिकणारी माझी लेकच हजरजबाबीपणे उत्तर देते. धाकटीने आधीच मित्रांशी भांडून मिरवणूकीतला झेंडा हाती घेतला होता. मुलगी धीटपणे बोलली म्हणून मला तिचं कौतुक वाटलं खरं. पण एकीकडे असंही मनात येत राहिलं की किती वर्ष मुलींना त्यांचे हक्क असे मागूनच मिळवत राहायला लागणार आहे?

- **वर्षा जोशी-आठवले**
मोबाईल क्र. 9527799300

भूमी आठवले

बाकी

गेले सारे कौतुक वाया,
खरेच का गुन्हे असे घडले..??

थोपटली मी उजेडाची पाठ,
दार काळोखाचे रडले..

दिवसाच्या आडोशाला रेंगाळली पाऊले सांजेची,
कुणी मनाचे तिमिर ओरबडले..??

आरक्त क्षितिजावर पुसटसे डाग जखमांचे,
आभाळाच्या आसवांत श्वासही होरपळले..

पसरले धुके स्वच्छ धवल तरंगांचे,
स्वप्न मेघांनी शितल चांदण्यांचे पांघरले..

यावी आता शांत निज रात्रीच्या कुशीत,
कित्येक इच्छाचे, सांत्वनांचे रुजणे बाकी उरले..

- **प्रचिती आठवले**
मोबाईल क्र. – 9653376982

रिअर व्ह्यू

गाडीला किक मारली अन निघालो तर आहे खरा

पेट्रोल... असावं बहुदा पुरेसं

शहरातले गर्दीचे रस्ते केंव्हाच मागे पडले आहेत

आता ह्या रस्त्याला गर्दी नाही फारशी

पण ठिकठिकाणी सांडलेलं ऑईल

रस्त्याला चिकटलेलं टायरचं रबर आणि

फुटलेल्या काचांचे तुकडे...

म्हणजे बरेच जण इथून वेगात गेले असणार...

माझाही वेग वाढतोच आहे..

समोरच्या रस्त्यावर लक्ष द्यायला हवं

पण

आत्ता जो कडेला उभा असलेला लहान मुलगा होता..

तो कुतुहलाने का बघत होता माझ्याकडे?

की हसत होता माझ्यावर...

छे! हसत नसेल...

त्या छोट्याशा गावापुरतं मर्यादित विश्व त्याचं.

त्याला काय कळणार

लोकं का अशी वेगात जात असतात...

अजूनही रीअर व्ह्यू मधे दिसतो आहे तो

विचार करता करता वेग फारच वाढला वाटतं!

कारण व्हायब्रेशन मुळे तो आरसा आता थरथरतो आहे...

आजूबाजूचं जग म्हणजे फक्त सरकणाऱ्या रेषाच...

समोर काय येईल हे ही सांगता येत नाही..

ह्या क्षणी सोबत आहे फक्त...

त्या मुलाची थरथरणारी, हसणारी प्रतिमा आणि...

पायाखालून चारच इंचावर

सरकणाऱ्या रस्त्याची धूसर जाणीव....

- नचिकेत सतीश आठवले

मोबाईल क्र. – 9900062540

नवरात्र

नवरात्राच्या नऊ दिवसांचे

वैभव आईचे काय वर्णू हो!!

नवरात्रीच्या नऊ माळांनी

तेज तिचे किती दिपवी हो!!

आशीर्वादे तिच्याच लाभे

विजयादशमी दसरा हो!!

दु:ख,दैन्य,अहंकार मिटवुनी

करूया सीमोल्लंघन हो!!

लाभू दे आता श्रीरामकृपे

सुखसमृद्धी,आनंद हो!!

विजय मिळो सात्त्विकतेला

नाश करू रावणप्रवृत्तीचा हो!!

जपत राहू ऋणानुबंध हे

लुटुनी सोनेरी शुभेच्छा हो!!

- **सुलभा श्रीकांत आठवले**

माझे ऑस्ट्रेलियन अनुभव

आमचे सतीश दादा मला नेहमीच म्हणतात, शुभा काहीतरी लिही... आज प्रयत्न करते आहे.

कुठून सुरुवात करावी कळत नाहिये पण इंग्लिश मध्ये म्हणतात ना...व्हेन यू डू नॉट नो व्हेर टू स्टार्ट, स्टार्ट at द बिगिनिंग...

तर माझा जन्म दिल्लीचा आणि शिक्षण सर्व इंग्लिश माध्यमातून. कॉन्व्हेंट नव्हे, खासगी शाळा आणि या शाळेचा मला प्रचंड अभिमान आहे कारण माझ्या शाळेत धर्माचे शिक्षण नव्हते. इंग्रजीमधून शिक्षण झालं असल्याने असेल बहुधा मी विचार इंग्लिशमध्ये करते मग हिंदीत आणि शेवटी मराठीत. म्हणूनच मराठीत लिहिण्याचं धाडस होत नव्हतं. हिंदीत म्हणतात, ओखली में सर दिया तो मुसळ से क्या डर. तर असो, मी आज जे लिहिते आहे ते माझ्या ३२ वर्षांच्या ऑस्ट्रेलियामधल्या अनुभवांबद्दल आहे.

पण सुरुवात तर सुरुवातीपासूनच व्हायला हवी.

दिल्लीत आई बाबांचा मित्र परिवार मोठा. साठ आणि सत्तरच्या दशकात या त्यांच्या मित्रांची मुले (मुली नाहीत) विविध शिष्यवृत्ती मिळवून अमेरिकेला जायला लागली होती. परदेशात शिकायला जायचं असेल तर शिष्यवृत्ती मिळवायलाच हवी कारण फी पालकांना परवडणारी नव्हतीच. विद्यापीठेही नावाजलेली असत. हार्वर्ड, MIT आणि इतर IVY League ची कॉलेज.

इथे लॉ, इंजिनीअरिंग, मेडिसिन, मॅनेजमेंट अशा पदव्या मिळवून अमेरिकेतच ही मंडळी स्थायिक होत गेली. ऑस्ट्रेलियात तर १९७१ पर्यंत व्हाईट ऑस्ट्रेलिया पॉलिसी असल्यामुळे इथे भारतीयांना प्रवेशच नव्हता!

८० च्या दशकात ऑस्ट्रेलियात बदल घडला आणि सर्व प्रथम भारतातून डॉक्टर्स येऊ लागले. हळू हळू IT चा प्रसार वाढला आणि सॉफ्टवेअरची मंडळी येऊ लागली. नंतर इंजिनीयर येऊ लागले आणि म्हणूनच आम्हाला संजयच्या इंजिनियरिंग डिग्रीमुळे १९९२ मध्ये पर्मनंट रेसिडेन्सी मिळाली आणि आम्ही इथे आलो.

हळू हळू जम बसवत गेलो. पुष्कळ स्थित्यंतरे आली, सामोरे जात राहिलो.

१९९२ च्या मंदीत संजयची नोकरी गेली पण भारतात कळवलं सुद्धा नाही. अर्थात ऑस्ट्रेलिया कोणालाच उपाशी किंवा उघड्यावर येऊ देत नाही. बेरोजगारी भत्ता घ्यायची वेळही आली नाही कारण देवाच्या कृपेने नोकरी मिळाली ती सिडनीपासून ६०० किलोमीटरवर! त्या गावाची लोकसंख्या ५०००! ओळखीचे कोणी नाही! पण घर भाड्याने मिळाले आणि सुरळीत चालू लागले. सिडनीत पाच दहा मराठी कुटुंबांशी ओळख झाली होती पण या छोट्याश्या गावांत फक्त गोरे ऑस्ट्रेलियन होते. हे लोक आपल्याला कशी वागवतील ही काहीच कल्पना नव्हती. या गोऱ्या ऑस्ट्रेलियन लोकांनी आम्हाला मस्त सामावून घेतलं आणि खूप मदतही केली.

मला इंग्लिश संस्कृतीचा शाळेमुळे परिचय असल्यामुळे मी मैत्रिणी पण जोडल्या. इंग्लिश अस्खलित असल्यामुळे खूप सोपे गेले मला, तरी पण इथल्या उच्चारांची सवय व्हायला थोडा वेळ लागला.

आज मी स्वतःला पूर्णपणे ऑस्ट्रेलियन समजते. फिर भी दिल है हिंदुस्थानी.

सुपरमार्केटमध्ये हिंदी, मराठी कानावर पडलं की लगेच बोलणाऱ्यांशी ओळख करून घेते. ती मंडळी नवीन असतील आणि त्यांच्याकडे गाडी नसेल तर त्यांना घरी सोडून येते. कधी कधी आधी माझ्या घरी चहा पाणी करायला नेते आणि मगच त्यांना घरी सोडते.

पण हे सगळं आता गेल्या दहा वर्षात करायची वेळच आली नाहीये.

भारतातून इकडे स्थलांतर खूप वाढलं आहे. शिवाय भारतातून येणारी ही नवीन पिढी खूप हुशार तर आहेच पण आर्थिकदृष्ट्याही खूप समृद्ध आहे. त्यांच्या उत्तम शिक्षणामुळे त्यांना छान व भारी पगाराच्या नोकऱ्या पटकन मिळतात हे दिसत आहे. आल्यावर पहिल्याच आठवड्यात गाडी घेत असल्याचंही चित्र दिसत आहे.

नुकतीच अशीच एक तरुण आई मला दुकानात भेटली. भेटली म्हणजे काय, मीच तिच्याशी जाऊन बोलले. तीही दिल्लीची निघाली म्हणून आमच्या गप्पा अर्धा तास रंगल्या. तिच्या बोलण्यावरून असं समजलं, की ऑस्ट्रेलियामधलं शिक्षण आंतरराष्ट्रीय विद्यार्थ्यांसाठी खूप महाग आहे. शिवाय आई वडलांनी लोन घेऊन आपल्याला परदेशी पाठवावं असं तरुणांना वाटत नाही. त्यातून बरेच विद्यार्थी इथं येऊन परत गेले कारण सांस्कृतिकदृष्ट्या ते इथं सामावू शकले नाहीत. विद्यापीठात मुलांच्या ग्रुपमध्ये ते मिसळू शकले नाहीत. त्यांना होम सिकनेस जाणवू लागला, शिवाय स्वतः स्वयंपाक करायची सवय नसल्यामुळे सतत बाहेरचे जेवण परवडले नाही. औषधोपचारही त्यांना उपलब्ध नाहीये. अशा परिस्थितीत काही मुले नैराश्यग्रस्त होऊन परत भारतात गेली. काहींनी आई वडिलांचे पैसे फुकट घालवले पब वगैरेमध्ये जाऊन.

आज जगातल्या मोठ्या मोठ्या विद्यापीठांनी शिक्षणाचा धंदा केला आहे. आता मेरिटऐवजी फी भरली की दाखला मिळतो. आणि विद्यापीठं युनिव्हर्सिटी असा विचार करतात की हे विद्यार्थी तर आपापल्या देशात परत जाणार आहेत. तिथे जाऊन काही का होई ना! हे बाहेरून आलेले विद्यार्थी थोडेच आपल्या इथल्या मुलांबरोबर स्पर्धा करणार आहेत!

बाहेरच्या देशात नुसती डिग्री घेऊन इतक्या पटकन नोकरी मिळत नाही आणि कायमच्या वास्तव्यासाठी परवाना तर नाहीच नाही. नोकरी देणाऱ्या कंपनी समोर एक लोकल विद्यार्थी आणि एक परदेशी विद्यार्थी निवडायची वेळ आली की ती कंपनी लोकलला प्राधान्य देणाराच.

तर, ही तरुण आई मला सांगत होती की हल्ली ऑस्ट्रेलियन सरकार हे पटापट भारतीयांना कायमस्वरूपी वास्तव्याचा परवाना देत आहे. असा परवाना मिळाल्यावर मेडियकेअर मिळते, शाळा, विद्यापीठ फी माफ होते. हल्ली जॉब मार्केट खूप हॉट आहे असंही ती सांगत होती!! फायनान्स, आयटी ही क्षेत्र खूप किफायतशीर आहेत. भारतातून पदवी आणि कामाचा अनुभव घेऊन आलेल्यांना लवकर नोकऱ्या मिळत असताना दिसत आहे. ऑस्ट्रेलियामध्ये भारतीय वंशाच्या लोकांची संख्या ७,८०,००० पेक्षा जास्त आहे. २०१६ पासून जवळजवळ १,६५,००० ची त्यात वाढ झालेली आहे. स्थलांतरित गट गेल्यामुळे, भारतीयांची संख्या चिनी लोकांपेक्षा जास्त आहे. आणि आता ते ब्रिटिशांच्या खालोखाल दुसऱ्या स्थानावर आहेत. मोनाश विद्यापीठाचे डेमोग्राफर धर्मा अरुणाचलम म्हणतात, की त्यांचे देशवासी पाच वर्षांच आरामात अव्वल स्थानावर पोहोचतील आणि आमचा निर्विवाद वर्चस्व असलेला स्थलांतरित गट तयार होईल. आणि या सांस्कृतिक गटाचा ऑस्ट्रेलियन समाजावर इतर कोणत्याही समाजापेक्षा जास्त प्रभाव पडू शकतो. येथील ६३ टक्के भारतीयांनी २०१६ मध्ये पदवी किंवा पदव्युत्तर पदवी प्राप्त केली होती. (सर्वात अलीकडील आकडेवारी आणि ऑस्ट्रेलियामध्ये जन्मलेल्या 24

टक्क्यांच्या तुलनेत). ते ५१ ट्केक पूर्णवेळ दराने (४७ टक्के जन्माने ऑस्ट्रेलियन असलेले आणि ३३ टक्के जन्माने चिनी असलेल्यांच्या तुलनेत) उत्तम नोकरीवर आहेत. विशेष म्हणजे त्यांच्या पसंतीचा व्यवसाय म्हणजेच आयटी क्षेत्र सध्या तेजीत आहे. म्हणजेच त्यांचे वैयक्तिक उत्पन्न मजबूत आहे, ते २३ टक्के अधिक आहे. २०१६ मध्ये वर्षाला $९१,000 पेक्षा जास्त ते कमवत आहेत. (तर जन्माने ऑस्ट्रेलियन असलेल्यांनी २४ टक्के त्या पातळीवर कमावले आहेत).

आम्ही आमचे कौशल्य घेऊन हिंमतीने इथे आलो आणि इथल्या इतर सर्व गोष्टी स्वीकारताना आमच्या संस्कृतीलाही आम्ही धरून ठेवले. आमच्या पूर्वीच्या गोष्टींसह इथे मिसळून गेलो. ती आई पुढे म्हणते, “भारतीय लोक नवीन ठिकाणी आल्यावर दुधात साखरेप्रमाणे विरघळतात.”

“अदृश्य, तरीही सर्व काही गोड बनवणारे.”

- **शुभा संजय आठवले, ऑस्ट्रेलिया**

तीळ दाण्याचे आंबट गोड पंचामृत

साहित्य : दाणे, सुकं खोबरं, पांढरे तीळ, चवीनुसार लाल तिखट, मीठ, चिंच, गूळ, काळा गोडा मसाला व फोडणीचे साहित्य

कृती : प्रथम दाणे व पांढरे तीळ भाजून घ्यावेत. खोबऱ्याचे काप करावेत. चिंचेचा कोळ काढून घ्यावा. तेलाची फोडणी करावी. फोडणीमध्ये मोहरी, हिंग, हळद घालावे. फोडणीत चिंचेचा कोळ व गूळ घालावा. गूळ विरघळल्यावर त्यात भाजलेले दाणे, खोबऱ्याचे काप व तिळाचे कूट घालावे. नंतर पाणी घालावे. नंतर तिखट, मीठ, काळा गोडा मसाला घालावा. हे पंचामृत खूप उकळावे म्हणजे आठ दिवस सुध्दा टिकते.

आपल्याकडे सणावाराला नैवेद्याला हे पंचामृत आवर्जुन केले जाते. आवडत असल्यास यात काजुचे तुकडे व बेदाणे घालावेत. हे पंचामृत चविष्ट तर लागतेच परंतु पौष्टिकसुध्दा आहे.

अभिनय पाककृती

साहित्य : सहनशक्ती एक कप, समाधान एक कप, क्षमाशीलता एक कप, आत्मविश्वास पाऊण कप, प्रोत्साहन अर्धा कप, एकमेकांवरील विश्वास एक गॅलन, चुकीची कबुली एक गॅलन, एखादे भांडण चवीपुरते.

कृती : वरील सर्व मिश्रण संसाररुपी भांड्यात प्रेमाने ढवळावे. हट्टीपणा, दुसऱ्यावर टीका, मत्सर, हेवा हे खडे काढून टाकावेत. त्यागाच्या मंदाग्नीवर हे मिश्रण ठेवावे. ते थंड होऊ देऊ नये. आत्मीयतेने निरीक्षण करावे. हा पदार्थ केव्हाही करता येतो.

बायकोने नवऱ्याला, नवऱ्याने बायकोला, मुलांनी आईवडिलांना किंवा सासूसुनांनी एकमेकींना तसेच मित्र मैत्रिणी सगेसोयरे यांना द्यावा. हा पदार्थ जन्मभर टिकतो. तसेच जीवनाला रुची आणतो.

- **उमा सतीश आठवले**

मोबाईल क्र. - 98221 38317

फणसाचे सांदण

साहित्य : फणसाचा रस दोन वाट्या, गूळ १ वाटी, तांदुळाचा रवा साधारण अडीच, तीन वाट्या, साजूक तूप २, ३ चमचे, अगदी चिमूटभर खायचा सोडा, जरुर असेल तर थोडं पाणी, चवीपुरते मीठ, आवडत असल्यास वेलची पावडर घालावी.

कृती : प्रथम तांदूळाचा रवा मंद गॅसवर तुपावर चांगला भाजून घ्यावा. गार झाल्यावर त्यात फणसाचा रस, गूळ, चवीपुरतं मीठ घालून चांगलं एकजीव करावं. वाटल्यास पाणी घालावं. (इडलीच्या पीठाइतपत सरसरीत असावं) मिश्रण साधारण अर्धा तास मुरु द्यावं. नंतर सांदण करतेवेळी चिमूटभर सोडा घालून व्यवस्थित ढवळावं. मग इडलीपात्रात इडल्या करतो तसं १५ मिनिटं वाफवून घ्यावं. थाळीत लावलं तरी छान होतात.

पातोळे

साहित्य : शक्यतो श्रावणी काकडी किंवा तवसं, गूळ, तांदुळाचं पीठ, मोठा चमचाभर तूप, चवीपुरतं मीठ आणि हळदीची पाने.

कृती : प्रथम काकडी धुवून सालं काढून किसून घ्यावी. पातेलीत चमचाभर तूप घालून त्यात किसलेली काकडी घालावी व मंद गॅसवर झाकण ठेवून वाफ आणून चांगली शिजवून घ्यावी. नंतर जेवढा काकडीचा किस असेल त्या मापाने चिरलेला गूळ घालून तो पूर्ण वितळू द्यावा. चवीपुरते मीठ घालावे, किंचित हळद घालावी. गॅस बंद करावा. हे मिश्रण थोडे कोमट झाले की त्यात मावेल एवढे तांदूळाचे पीठ घालून सैलसरच भिजवावे. वेगळं पाणी घालावं लागत नाही.

हळदीची पाने अगोदर धुवून उभी करुन ठेवावी. नंतर पानाच्या अर्ध्या भागावर तयार केलेलं पीठ पातळ पसरवावे. नंतर ते पान बंद करावे. असे पातोळे तयार करून मोदकपात्रात किंवा मोठ्या पातेल्यात पाणी व चाळण ठेवून शिजवून घ्यावे. शिजवताना चाळणीत उभे लावावे. एकावर एक ठेवू नये. कच्चे राहू शकतात. उभे लावण्यासाठी चाळणीच्या मधे छोटा उभा गंज किंवा भांडं ठेवून बाजूने पातोळे उभे लावावे. १२,१५ मिनिटं झाली की गॅस बंद करावा. १० मिनिटानी काढून ठेवावे. असाच परत दुसरा घाणा लावावा.

- **मेधा आठवले, पुणे**
  मोबाईल क्र. - 7276195642

आयुर्वेदातील गणित

सहसा आयुर्वेदामधे डॉक्टरेटसाठी विषय निवडताना एखादा रोग व त्यावरचे औषध यावर संशोधन करतात. पण मी मात्र एखाद्या वेगळ्या विषयाच्या शोधात होते. त्यासाठी आयुर्वेद ग्रंथ चरक संहिता व सुश्रुत संहितेचे वाचन सतत करायची. प्रत्येक वेळी नवीन काहीतरी गवसायचे. श्लोक तेच पण प्रत्येक वेळी नुसते भाषांतर न वाचता विचार पूर्वक श्लोक वाचल्यावर त्यातील व त्या मागील अर्थ उमजत जातो. आयुर्वेदाचा उगम इ.स. पूर्व ६००० वर्षे मानला जातो. पाणिनीचा काळ 7th century BC आहे. आयुर्वेदाचा आपण ३ भागात विचार करू शकतो.

१) वैदिक पूर्व काल २) वेदिक काळ ३) ऋषी काळ (आर्षकाळ).

वैदिक पूर्वकाळाबद्दल फारसे काही आढळत नाही. त्याकाळी मुख्यत: हिंदू धर्मातील धार्मिक विधी जास्त महत्त्वाचे मानले जात व संस्कृत भाषा बोलली जात असे. धार्मिक कृत्यात ॲस्ट्रॉनॉमी हा मुख्य भाग होता. त्या बरोबरच गणित, जॉमेट्री विविध औषधोपचार यांचा उपयोग केला जात असे.

वेदिक काळात ४ वेद- ऋग्वेद, सामवेद, यजुर्वेद व अथर्ववेद. या वेदांमध्ये अथर्ववेद हा आरोग्यविषयक पूर्ण माहिती देणारा अधिकृत असणारा वेद आज पूर्णपणे उपलब्ध आहे. आयुर्वेद हा अथर्व वेदाचाच उपवेद आहे.

आर्ष किंवा ऋषी काळ - हा काळ अनेक शतकांचा आहे. ह्याच काळात धन्वंतरी आणि भारद्वाज ह्यांना आयुर्वेद इंद्राकडून मिळाला. त्यानंतर दोन संप्रदाय उदयास आले.

१)आत्रेय संप्रदाय - (School of Medicine)

ज्या मध्ये अग्निवेश संहिता सुप्रसिद्ध आहे. त्यामधे ४६५०० श्लोक आहेत. ह्या अग्निवेश संहितेत जवळपास आठशे वर्षांमधे संस्करण होत होत आजची चरक संहिता आपण अभ्यासतो.

दुसरा संप्रदाय School of surgeons ज्यामधे सुश्रुत संहिता हा प्रमाण ग्रंथ आहे. सुश्रुतला धन्वंतरींकडून हे ज्ञान प्राप्त झाले. संस्कारित नवीन चरक संहितेचा काळ ५०० BC ते २५० BC आहे. काळासंबंधी फार खोलात न जाता आयुर्वेदामधे समकालीन गणितज्ञांच्या गणिताचा कसा उपयोग केला गेला आहे व ते गणित आजच्या काळात सुद्धा कसे चपखल बसते हा आपला विषय आहे. सर्वात नवीन संस्कारीत चरक संहितेचा काळ cratery 400 AD आहे. आर्यभट्ट आणि वराहमिहीर हे त्या काळातील सर्वश्रेष्ठ गणितज्ञ आहेत. त्याचप्रमाणे सुश्रुताचा काळ हा 200 century AD आहे त्या काळामध्ये भूमितीचा पण प्रभाव होता जो सुश्रुताच्या सूत्रस्थानाच्या 22व्या अध्यायात दिसून येतो. आपणास माहीत आहे की संपूर्ण आयुर्वेद संस्कृत मध्ये श्लोकबद्ध केलेले आहे.

संख्या स्याद गणितम्। सम्यक् ख्यायते ज्ञायते अनया॥ चरक संहिता।

संख्या म्हणजे गणित

ज्या मुळे परिस्थितीचे अचूक ज्ञान होते ती संख्या.। गणितामिहैक द्विन्न्यादि॥ हे ज्ञान गणितामुळे मिळते.

चरकसंहिता वाचतांना चरक सूत्र स्थानातील २९ ते ३५ श्लोकांनी माझे लक्ष वेधून घेतले. Criticaltical study of an Ancient Indian Mathematics as a contemporary science in Ayurred हा विषय सुचला.

परापरत्वे युक्तिश्च संख्या संयोग एव च। विभागश्च पृथक्त्वं च परिणाम थापिच॥

संस्कारो अभ्यास इत्येते गुणा ज्ञेय परादयः। 11-24-27-29-35

१) योग म्हणजे एकत्रिकरण (addition बेरीज

२) विभाग म्हणजे पृथक्करण 3 प्रकार

१) विभक्तिExcision 2) वियोग - व्यकलन 3)भागशोग्रहdivision

३) पृथकत्व -3प्रकार ⟶ असमयोग partial seperation वैलक्षण्य(Classical seperation अनेकता Indivisual seperation

४) परीमाण वजन, लांबी, रुंदी, मोजणे

५) संस्कार ⟶ नवीन तयार करणे (Process which infuses new quality.)

६) युक्ति ⟶ योजना

७) परत्व, अपरत्व जागा वय वगैरे मोजणे परत्व म्हणजे सुपिरियर अपरत्व म्हणजे इंफीरियर

लौकीक वैदिके वापि -ह्या भास्कराचार्यांच्या श्लोकानुसार वैद्यकीय शास्त्रात गणित आवश्यक आहे असं भास्कराचार्यांनी म्हटलेच आहे. अर्थात त्याचा उपयोग केला गेलाच आहे. पण आयुर्वेद श्लोकबद्ध आहे. सगळ्या आकड्यांचा उपयोग शब्दांकात केला गेला आहे. सगळ्या संख्या, त्यांचे गणित हे सर्व शब्दांकात (in words) आहे. उदा. प्रथम, द्वितीय, द्वे. त्रय, त्रिक, चत्वार, चतुर्विध, पंच, पंचक, षट्, षष्टक, सप्तम, अष्ट इ. अगदी अपरिसंख्येय पर्यंत अंकगणित, बीजगणित, भूमिती, भागाकार गुणाकार, एवढेच काय परम्युटेशन-कॉम्बीनेशन, सेट थेअरी वगैरेचा उपयोग केला गेला आहे. इथे लेखाच्या विस्तार भयास्तव काहीच उदाहरणे देत आहे.

अंक गणित - एक पासून अगणित संख्या (अपरिसंख्येय) Additions ⟶ संयोग -

सत्वात्मा शरीरं च त्रयमेतस्त्रि दंडवत्। लोकस्तिष्ठति संयोगात तत्र सर्व प्रतिष्ठितम्" चसू. 1/146 अशा प्रकारे अनेक योगांचे उपयोग सांगितले आहेत.

substraction > Vyakalan - उणे. वजा

एकंदर १६ प्रकारची मुळे उपयोगी आहेत. त्यापैकी 3 वमनासाठी, 2 नस्यासाठी, आणि उरलेल्या ११ विरेचनासाठी उपयोगात आणतात.

गुणाकार - चतुर्गुणे जले मूत्रे द्विगुणे चित्रकात पले (Multiplication)

चित्रक व पलाश (समप्रमाण) चूर्णात चौपट पाणी आणि दुप्पट. गोमूत्र घालून उकळावे. भागाकर करुन उरलेल्या भागाला अवशिष्ट म्हणतात. बला गुडुची त्रिफला, समप्रमाणात घेऊन त्यात १० लिटर पाणी टाकून एक चतुर्थांश राहीपर्यंत उकळावे.

कॉंबिनेशन पर्म्युटेशन-

भास्कराचार्य लिहितात देवीच्या १० हातात (दशभूजा) प्रत्येकी एक याप्रमाणे वेगवेगळी शस्त्रे आहेत. आणि देवी ती शस्त्रे एका हातातून दुसऱ्या हातात बदलत जाते. ह्या परम्युटेशन व कॉंबिनेशनचा उपयोग करून, दोष धातु व द्रव्यातील रस यांच्या परम्युटेशन आणि कॉम्बीनेशनने चिकित्सा केली जाते.

संसर्गाद्रसरुधिरा दिभिस्तथैषां दोषास्तु क्षयसमता विवृद्धि भेदैः ॥" तत्र वृद्धी भेदा: 25, क्षयभेदा: 25, समभेदा: 12 एवं गणनया 62 भेदा: सम्पद्यते ॥

हे नुसतं वाचतांना किचकट वाटेल पण आयुर्वेदात शरीर हे 3 दोष (वात पित्त कफ), 7धातु (म्हणजे मेटल नाही) (रस, रक्त, मांस, मेद, अस्थी, मज्जा, शुक्र) 3 मल (पुरीष, मूत्र, स्वेद).

सम दोषा समाग्निश्च सम धातु मलः क्रिया हे तिन्ही जेव्हा समान असतात तेव्हा शरीर निरोगी असते. पण वर सांगितल्याप्रमाणे जेव्हा त्यात कमी किंवा वृध्दी होते तेव्हा रोग उत्पन्न होतात. मग त्यांना समान करण्यासाठी द्रव्य वापरावी लागतात. हे वरील सूत्राचा उपयोग करून क्षय झालेल्यांची वृध्दी करुन वाढलेल्यांना कमी करण्यासाठी ह्याचा उपयोग करावा लागतो.

SET Theory 7 चरक सूत्र स्थानाच्यापंचाशन्महा कषाय ह्या अध्यायात जीवनीय द्रव्ये, बृहणीय, लेखनीय इ.द्रव्यांचे महाकषाय सांगितले आहेत. सेट थेअरी त्यांना चपखल लागू पडते. प्रत्येक महाकषायात १० द्रव्ये आहेत. ही १० द्रव्ये एक सेट तयार करतात (मी ते चार्ट मधे बसवले आहेत. ते "Venn Diagram च्या साह्याने ने दाखविले आहेत.)

भूमिती - याचा उपयोग शस्त्रक्रियेतील शस्त्रे (उपकरणे) इ. रसशाळेतील यंत्रे कुमारागार, बांधण्यासाठी केला गेला आहे. तसेच बँडेजचे विविध प्रकारे बांधण्यासाठी केला आहे

मान परिमाण ⟶ सुश्रुत कुडव, पल, प्रस्थ, आढक, द्रोण, भार ई. - मरिची, यब, भाषक इ. त्या काळातील वजने वापरली आहेत

स्टॅटिस्टिक्स -

अध्येय अध्ययनसात बुद्धि: ।

डाटा एकत्र करून त्याचे ॲनालिसीस करून स्टॅटिस्टीकमध्ये सेंसस (census) म्हणजे डाटा एकत्र करणे, कंपाईलिंग करणे, आणि demographic प्रकाशित करणे, आर्थिक आणि सामाजिक प्रकरणे पण यात येतात. ॲव्हरेज, मिन, मिडीयन भोड, सँपलींग हे सगळे आयुर्वेदात आहे.

यैः हि अविदितैः चिकीत्सा नैव सिध्यति ।

आयुर्वेदात रुग्णाला तपासण्याच्या पध्दतीचे अनेक श्लोक आहेत. हिमालयातून निघणाऱ्या नद्यांचे पाणी शुद्ध असते, मलय पर्वतातून निघणारे पाणी स्वच्छ (clear) असते. विंध्य मधील नद्यांचे पाणी त्वचारोग कारक, हत्तीरोग रोग कारक असते ही सगळी Biostatitics ची उत्तम उदाहरणे आहेत. खूप मीठ खाणाऱ्या लोकांचे स्नायू शिथिल असतात. विशेषत: बाल्हीक प्रदेश (तेव्हाच) सौराष्ट्र, सिंधु प्रांतातील (लोक मीठ खूप खातात.) मीठासह दूध पितात. अशा लोकांचे केस लवकर पांढरे होतात व गळतात. अशा प्रदेशात झाडे उगवत नाहीत किंवा वाढ़ अत्यंत हळू असते.

युगे युगे धर्मपाद: क्रमेणानेन हीयते ! गुणपादश्च भूतानामेव लोका: प्रलीयते ।

संवत्सरशते पूर्णे याति संवत्सरः क्षयम् देहिनाम आयुष: काले यत्र यन्मान मिष्यत । च.वि.

चरक विमान स्थानात अशा जनपद ध्वंस प्रकरणात खूप छान विचार करण्यात आला आहे. अंकगणित व इतर गणिताच्या प्रकारांचा एवढ्या छोट्या लेखात समावेश करतांना प्रातिनिधिक सूत्रे दिली आहेत. चरक संहिता हा चिकीत्सा शास्त्र (Medicine) व सुश्रुत संहिता हा शल्यशास्त्रावरचा मूल ग्रंथ आहे. दोन्ही ग्रंथांमधे श्लोकरचनेतून अंतिम सिद्धांत सांगण्यात आले आहेत. परंतु त्यामागची कार्यपद्धती वर्णिलेली नाही. जेव्हा जेव्हा गरज वाटली तेव्हा तेव्हा त्यांनी त्या त्या काळातील वैज्ञानिक गोष्टी (गणित, केमिस्ट्री वगैरे) गोष्टींचा उपयोग करून अंतिम सिद्धांत सांगितला आहे.

अन्य शास्त्रोपपन्नानां चार्थानामिहोपनीतानामर्थवषातेषांत द्विद्येभ्य एवं व्याख्या नमनुश्रोतव्यं, कस्मात् ?

न ह्येकस्मिन शास्त्रे शक्य: सर्व शास्त्राणामवरोधः कर्तृम् ॥" सु.सू. या शिवाय संहिताकार म्हणतात..

मंदाना व्यवहाराय बुधानां बुद्धिवर्धये तेषां कर्मसु बाह्येषु योगभाभ्यंतरेषुच संयोगंच प्रयोगंच यो वेदसमभिषम्बरः। चरक सूत्र स्थान

ते म्हणतात कमी बुद्धी असणाऱ्यांसाठी जे लिहीले आहे ते व्यवहारात पुरेसे आहे. बुद्धिमानांना विचार करण्यासाठी बुद्धी वर्धना साठी आहे. संयोग व विविध प्रयोग करून (बुद्धी वापरून) तो सर्वश्रेष्ठ (भिषग्वर) वैद्य होऊ शकतो.

Mathematics is language of science. आज आपला रिसर्च सिद्ध करायला गणिताची मदत घ्यावी लागते. आयुर्वेदातील सूत्रे देखील गणितावर आधारित आहेत म्हणूनच आयुर्वेद हे आपले प्राचीन शास्त्र आहे, सायंटिफिक शास्त्र आहे.

- डॉ. संयुक्ता (आठवले) गोखले.

M.D. Ph. D. (आयुर्वेद)

मोबाईल क्र. - 9422819745

नामी शक्कल

“२० एप्रिलला मिळू शकेल का कार्यालय?” मी कार्यालयाच्या व्यवस्थापकाला विचारलं.
“सॉरी सर, पण २० ला शक्य नाहीय.”
मला हे उत्तर चाळीसाव्या वेळा ऐकायला मिळालं.
करोनाकाळ असल्याने कार्यालय मिळणं फार अवघड झालं होतं.

जितकी शक्य होती ती कार्यालयं, छोटे हॉल बघून झाले, पण २० एप्रिलला कुठलंही कार्यालय उपलब्धच नव्हतं. तो लग्नाचाच मुहुर्त होता, मुंजीचा असता तर एकवेळ ठीक. पण सध्या इतकी बंधनं असताना ही जवळपासची सगळी कार्यालयं बुक म्हणजे जरा नवलच वाटलं.

भावाच्या मुलीच्या लग्नासाठी कार्यालय बुक करायचं होतं, मला वाटलं होतं सहज मिळेल, पण कसंचं काय! सहज मित्राशी बोलता बोलता हा अनुभव सांगितला तर तो म्हणाला, अरे, २० एप्रिलला कोल्हापुरला पण कार्यालय उपलब्ध नाहीत, त्यालाही त्याच्या नातेवाईकासाठी कोल्हापुरात कार्यालय हवं होतं.

मग मी माझ्या एका, जरा पॉलीटीकल संबंध असलेल्या मित्राला फोन केला तर तो म्हणाला, अरे, २० ला तुला आख्ख्या महाराष्ट्रात कार्यालय मिळणार नाही.
विचारलं “का?”
तर म्हणाला, “अरे त्या दिवशी महाराष्ट्रातल्या एका मोठ्या मंत्र्याच्या मुलाचं लग्न आहे. मुलीकडची मंडळी पण दिग्गज आहेत. त्यामुळे सगळी कार्यालयं त्यांनी बुक केली आहेत.”

“पण सगळी कार्यालय बुक कशासाठी?”

“अरे, प्रत्येक कार्यालयात मोठे मोठे स्क्रीन लावलेत, फक्त पंचवीस लोकं सोहळ्याला हजेरी लावणार, ऑनलाईन सोहळ्याचा आनंद घेणार, जेवून तृप्त मनाने घरी जाणार.”

“कार्यालयात स्क्रीनवरच्या नवरा नवरीसोबत फोटो काढ़ायची पण सोय केलीय, म्हणजे तुमची उपस्थिती संबंधित व्यक्तिंना लक्षात येणार.”

पर्पज सर्व्हर्ड.

- **नीता आठवले – गोडबोले**
  मोबाईल क्र. - 9822373974

सृजन रंग

मध्यंतरी अचानक माझ्या बागेतल्या मातीतून हिरवा - पोपटी लसलसता कोंब वर येताना दिसला. अत्यंत कोवळा पण प्रचंड जिजीविषा आपल्यात साठवलेला हा कोंब पाहताना हरखून जायला झालं, ते त्याच्या तेजाळ हिरव्या रंगानं.

जीवनाचा अर्थ सांगणारा हा हिरवा रंग विविध प्रकारे आपली सोबत करत असतो. निसर्गात तर या रंगाच्या अनेकविध छटा पहायला मिळतात. निसर्गाच्या विशाल कॅनव्हास वर या रंगाचे कितीतरी स्ट्रोक्स (फटकारे) चितारलेले दिसतात. रंगात जरी वैविध्य असलं तरी त्या सगळ्या छटांचा अर्थ एकच असतो आणि तो म्हणजे प्रचंड जीवनेच्छा. हा रंग माणसाला आयुष्याच्या प्रत्येक वळणावर भेटत रहातो.

बालपणीची चिमुकली लालस पावलं आणि मृदू मुलायम बाळमुठी पाहताना नेहमी आठवते ती तांबूस कोवळी पालवी. सतत हात पाय हलवणाऱ्या गोजिरवाण्या मुलाप्रमाणे ही पालवी सुद्धा फांदीवर मोठ्या डौलानं हिंदोळत असते. एका रसरशीत जीवनाची सुरुवात असते ती. हा सतेज ताम्रवर्ण हळूहळू पोपटी आणि नंतर दिसामाजी हिरव्याकंच रंगात कधी परावर्तित होतो ते त्याचे त्यालाही कळत नाही. बालपण आणि तारुण्याच्या सीमारेषेवरचा हा उन्मेष आपल्या अंगाखांद्यावर मिरवणारं झाड पाहताना तारुण्यसुलभ भावनांनी आणि लज्जेनं आरक्त झालेली एखादी अवखळ षोडशी नजरेसमोर येते. अर्थात इथेही पुन्हा जगण्याचा उत्सवच अनुभवायला मिळतो. आयुष्य रसरसून आणि भरभरून जगण्याच्या या अनोख्या वळणावर अचानक एखादा हिरवा रावा तिला भेटतो आणि त्या दोघांचं आयुष्य प्रेमाच्या हिरव्यागार मखमली गालिच्यावर हळुवार पावलं टाकत पुढे निघतं. हिरवागार, किणकिणता चुडा आणि हिरवी छटा ल्यालेला मोरपंखी शालू आयुष्याला एक अनोखं परिमाण बहाल करतो.

लग्नानंतरही हा हिरवा रंग तिच्या आयुष्यात आपल्या विविध छटासह हजर असतोच. कधी तो वसंतातून मोहरतो, तर कधी श्रावण होऊन बरसतो आणि बहरतो ही आणि मग सुरु होतो सृजनाचा सुखद महोत्सव, सृष्टीत आणि जीवनातही. बालपणातून पूर्ण तारुण्यात आलेल्या एखाद्या समंजस तरुणीप्रमाणे निसर्गालाही जणू डोहाळ्यांची चाहुल लागते आणि मोहरानं घमघमणाऱ्या आंब्यावर हिरव्यागार बाळ कैऱ्या लटकू लागतात. मांगल्य, मातृत्व आणि नवनिर्मितीचा हा हिरवा रंग जीवनात प्रत्येक पावलागणिक साथ करतो. हिरवगार वस्त्र आणि कांकणं ल्यालेली ही वत्सल माता, उर्वरा भूमीचच एक आगळं वेगळं आणि अनोखं असं रूप असतं.

असे अनेक वसंत फुलवत माणसाचं आयुष्य पुढे सरकत असतं. पहिल्यांदा लालस छटा ल्यालेली ती नाजूक पालवी हळू हळू डोळ्यांना सुखावणाऱ्या ओल्या हिरव्यागार रंगात न्हाऊन निघते. जीवनाच्या परिपूर्ण उत्सवात मोहरून उठते. निसर्गनियमाप्रमाणे नंतर हा सुखद हिरवा रंग हळूहळू फीका होऊ लागतो. एक पिवळसर छटा त्यामध्ये सामावू लागते आणि अखेर जीर्ण शुष्क झालेलं ते पर्ण वाऱ्याबरोबर भिरभिरत खाली जमिनीवर येऊन विसावतं. अर्थात या विसावण्यात सुद्धा निसर्गाची तीच जिजीविषा वरच्या फांद्यांवर मृदू मुलायम पालवी होऊन मिरवत असते, बहरत असते.

- **डॉ. शुभदा सुधीर मोघे, पुणे.**

शांतीकुंज हरिद्वार

भारतातील सर्वात सुंदर आणि उत्कृष्ट ठिकाण म्हणजे हरिद्वार. हिमालयाचे जागृत स्वप्न म्हणजे हरिद्वार. सप्त ऋषींची पावन तपोभूमी असणाऱ्या हरिद्वारला गायत्री परिवाराचा शांतीकुंज आश्रम आहे. जीवनातले सारे सौंदर्य, सारे पावित्र्य आणि सारी सुचिता तेथे एकवटली आहे.

आचार्य पंडित श्रीराम शर्मा, जे विश्वात्मयोगी म्हणून ओळखले जातात, त्यांनी स्थापन केलेला हा दिव्य आश्रम आज गायत्री तीर्थ म्हणून ओळखला जातो. हे ठिकाण आजच्या काळात जनतेकडून ‘नवयुगाची गंगोत्री’ म्हणून ओळखले जाते. एकविसाव्या शतकातील 'शांतिकुंज, हरिद्वार' हा कल्पवृक्ष आहे. येथे उत्तुंग सकारात्मकता आहे. मानवाच्या सर्व पवित्र भावना येथे पूर्ण होतात.

आज परमपूज्य श्री गुरुदेव आणि वंदनीय माताजी देह रूपाने तेथे अस्तित्वात नाहीत तरीही त्यांच्या सूक्ष्म देहाने आणि दैवी सत्तेने तेथील संचालन चालते. परमपूज्य श्री गुरुदेव यांचे जावई आणि कन्या आणि त्यांचे सुपुत्र म्हणजे (गुरुदेवांचे नातू) डॉ. चिन्मय पंड्या सर्व व्यवहार अत्यंत श्रद्धेने आणि निष्ठेने पाहतात. परमपूज्य श्री गुरुदेव यांचे जावई डॉ. प्रणव पंड्या आणि तपोनिष्ठ कन्या श्रीमती शैलबाला यांनी शांतीकुंजला जणू स्वप्नभूमी म्हणावी असे सुंदर आणि अत्यंत आकर्षक असे रूप दिले आहे. तेथे ‘देव संस्कृती विद्यापीठ’ केवळ चारच विद्यार्थ्यांपासून सुरू केले असून आज शेकडो विद्यार्थी तेथे विविध प्रकारचे शिक्षण घेत आहेत. देश परदेशातील अनेक विद्यार्थी तेथे आज शिक्षण घेत आहेत. आध्यात्मिक साम्यवादाचे विलोभनीय केंद्र म्हणून शांतिकुंज हरिद्वारचा अभिमानाने उल्लेख केला जातो.

चारही बाजुंनी असलेल्या डोंगरांच्या कुशीत शांती कुंज आश्रम स्थापन झाला आहे. या आश्रमाची शिस्त, तेथील नैष्टिक जीवन, तेथील अनुशासन, तेथे मिळणारे प्रेम, आदर, आपुलकी आणि एकूणच दिव्यता अनुभवायला मिळाल्याने हजारो लोक गायत्री परिवारात सामील झाले आहेत. अनेक मोठ्या हुद्द्यावरच्या लोकांनी तर आपले व्यवसाय सोडून दिले आणि परमपूज्य श्री गुरुदेव यांच्या कार्याला जीवनभर वाहून घेतले आहे. इतकी स्वच्छता, इतके पावित्र्य, वागण्यातील सौहर्द, प्रेम, जिव्हाळा की इतकेही सुंदर पवित्र जीवन नैष्टिकतेने माणसाला जगता येते हे अनुभवून जीवन धन्य धन्य वाटतं.

तेथील सर्व कार्यकर्ते पिवळ्या वस्त्रात वावरताना दिसतात. प्रत्येकाची कामे नेमून दिलेली. इतका मोठा अवाढव्य कारभार पण कुठेही गडबड, गोंधळ नाही. सारी कामे शांतपणे आणि शिस्तीत चाललेली. समोर दिसेल ते काम सर्व कार्यकर्ते आपुलकीने करतात. मी मोठा, हा लहान असा दुजाभाव नाही. त्यामुळे सारे वातावरण प्रेममय, आनंदमय.

पहाटे तीन पासून तेथील नैष्टिक, आध्यात्मिक जीवनाला प्रारंभ होतो. पहाटे चार वाजता श्री गायत्री मंदिरात सर्व परिवार आरती करण्यासाठी एकत्र जमतो. नंतर सर्व भक्तगण आपापल्या खोल्यांमध्ये जाऊन गायत्री साधना करतात. सकाळी सहा वाजता यज्ञ मंडपात नऊ कुंडी गायत्री यज्ञ सुरू होतो. साधारण एक तास हा यज्ञ चालतो. सर्व वातावरण गायत्री मंत्राने भारावलेले असते. यज्ञात आहुती टाकायला सर्वांना संधी मिळते. ज्याची आहुती यज्ञात टाकली जाते त्याला 'साकल्य' असे म्हणतात. त्यात विविध अशा वनस्पतींचे मिश्रण असते. यज्ञ झाल्यावर सर्व भक्तजन प्रवचनासाठी अगदी शिस्तीत सभामंडपात बसतात. जीवन सुंदर, सुखमय आणि आनंदमय कसे

करायचे याविषयी तेथील विद्वतजन प्रवचन करतात. यज्ञ झाल्यावर चहा फराळासाठी भक्तांना थोडा निवांतपणा मिळतो. चहा पाण्याची आणि नाश्त्याची उत्तम व्यवस्था येथे केलेली असते. जे चहा कॉफी घेत नाहीत त्यांच्यासाठी 'प्रज्ञापेय' नावाचे सुंदर चवीचे पेय तिथे मिळते. विविध औषधी वनस्पतींचे चूर्ण त्यात असते. वेगळीच पण मधुर चव असणारे हे पेय माणसाची बुद्धी तल्लख करते. लहान मुलांसाठी विविध प्रकारचा खाऊ तेथे मिळतो.

सकाळी नऊ ते साडेनऊ पासून उत्तम भोजन व्यवस्था असते. जेवणाला 'ब्रह्मभोज' असे म्हणतात. जेवण अगदी साधे आणि सात्विक असते. जेवणाची बैठी व्यवस्था असते. भोजन झाल्यावर प्रत्येकाने आपापली थाळी आणि वाटी स्वतः स्वच्छ करून ठेवावी लागते. पत्नीने पतीची थाळी धुवायची नाही. त्यानेच त्याची धुवायची हा दंडक. 'नर और नारी एकसमान' हे गायत्री परिवाराचे सूत्र. भोजनानंतर सर्व भक्तजनांना पूर्ण स्वातंत्र्य; त्यांनी बाहेर फिरण्यासाठी जावे किंवा तेथेच स्वेच्छेने साधना करावी. ज्यांनी गायत्री महामंत्राची दीक्षा घेतली आणि नऊ दिवसांच्या शिबिरात सहभागी झाले, फक्त असे जन साधना करण्यास तेथेच थांबतात.

संध्याकाळी सहा वाजता नादब्रह्म कार्यक्रम असतो. बासरीवर विविध राग आळविले जातात. साधारण तासभर हा कार्यक्रम असतो. त्यावेळी सर्व भक्त जणांना अतिशय शांत सुरेल 'नादब्रह्म' म्हणजे काय याची उत्कट प्रचिती येते. त्यानंतर भोजनाचा कार्यक्रम. त्यावेळी सकाळ प्रमाणेच साधे व सात्विक भोजन दिले जाते. रात्री आठ वाजता विधायक पण मनोरंजनाचा कार्यक्रम तेथील कलाकारांतर्फे केला जातो. हा कार्यक्रम अत्यंत अभिरुची पूर्ण आणि प्रेक्षकांच्या मनाचे उन्नयन करणारा असतो. संपूर्ण दिवस गायत्री मंत्रमय असतो. शांतीकुंजच्या विशाल परिसरात भक्तगणांना विशेष स्पंदने जाणवतात. ही भूमी खरोखर देवभूमी आहे याची प्रचिती येते.

येथील गायत्री देवीचे मंदिर अत्यंत विलोमिनी आहे. तपोनिष्ठ विश्वामित्र ऋषींनी ज्या जागेवर बसून गायत्री मंत्राची साधना केली त्याच जागेवर मंदिराची जागा निवडली आहे. विश्वामित्र ऋषींचे सर्वांना दर्शन व्हावे म्हणून त्यांची बैठी मूर्ती तेथे बसवली आहे. मंदिराच्या चारीही बाजूंनी भक्तजनांची बैठक व्यवस्था आहे. भिंतीवर वेद, उपनिषदांची वचने लिहिली आहेत. जसे 'अहं ब्रम्हास्मि' वगैरे. गायत्री ही वेद माता- वेदांची जननी, प्राणांचे रक्षण करणारी म्हणून गायत्री, विश्वाची जननी म्हणून विश्वमाता आणि देवांना सुद्धा आणणारी म्हणून देवमाता. गायत्रीचे रूप व तिचा महिमा लक्षात घेऊन अतिशय सुंदर आणि आकर्षक मंदिराची रचना केली आहे. सकाळ संध्याकाळ भक्तजन तेथे तिची आरती करण्यास जमतात. गायत्री देवीचा पूर्ण महिमा त्या आरतीत गायला जातो. अत्यंत भावपूर्ण आणि सामूहिक कृतीने म्हटली जाणारी ही आरती भक्तांच्या हृदयात भक्तीभावाचा कल्लोळ निर्माण करते.

शांतीकुंजची भूमी विविध वृक्ष, वेली, पाने आणि फुले यांनी भरली आहे. 'गायत्री विद्यापीठ' प्रेक्षणीय आहे. अनेक विद्यार्थी तेथे शिक्षण घेत आहेत. गायत्रीची महत्त्वाची 24 रुपं तेथे वेगवेगळ्या मूर्तींमधून दाखवली असून त्यांची चोवीस नावे सुद्धा त्या मूर्ती समोर लिहिली आहे जसे की ऋतंबरा, पयस्विनी, अमृता, वैष्णवी, शांभवी, ब्राह्मणी वगैरे. सप्तऋषींची पावनभूमी म्हणून सर्व सात ऋषींच्या मूर्ती त्यांच्या नावासकट तेथे पहावयास मिळतात.

'ब्रह्मवर्चस' नावाची इमारत अत्यंत वेधक असून गायत्री मंत्राचे विज्ञान उलगडून दाखवणारी मानवी मूर्ती तेथे आहे. मंत्र म्हणताना त्या शरीराच्या प्रत्येक भागावर गायत्री मंत्राच्या प्रत्येक अक्षराचा कसा परिणाम होतो ते दाखविले आहे. शांती कुंजमध्ये समृद्ध असे ग्रंथालय आहे. परमपूज्य गुरुदेव आचार्य श्रीराम शर्मा ऋतंभरा प्रज्ञा असणारे विश्वात्मयोगी होते असे का म्हणतात त्याचे उत्तर तेथील ग्रंथालयातील विविध विषयांवरील पुस्तके पाहिली की सापडते. सारी पुस्तके आचार्यांनी लिहिलेली. मानवी जीवनाला स्पर्श करणारी सारी पुस्तके तर आहेतच पण त्या व्यतिरिक्त चारही वेदांचे सरल सुबोध भाष्य, 108 उपनिषदांवरील भाष्य टीका, वीस स्मृतींचे हिंदी रूपांतर, अठरा

पुराणे आणि षटदर्शनावरील भाष्य, असे समृद्ध साहित्य तेथे आहे. ही ग्रंथसंपदा वाचण्यास आपले आयुष्य कमी पडेल असे वाटावयास लागते. गायत्री महाविज्ञान यावर तीन खंडात विस्तृत विवेचन केले असून या महान तपोनिष्ठ योगीराजाने हे सारे कोणत्या दिव्यशक्तीने लिहिले असावे? या विचाराने मन थक्क होते. आचार्य पंडित श्रीराम शर्मा कुणी मानवी व्यक्ती नसून प्रचंड दैवी शक्ती घेऊन आलेले महामानव निश्चित आहेत याची खात्री पट्ते. त्यांची ग्रंथसंपदा पाहून डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांनी असे उद्गार काढले होते की "मला या ग्रंथाची ओळख आधी झाली असती तर मी राजकारणात पडलोच नसतो."

तेथील वास्तू, भक्तजनांची आणि येणाऱ्या परिवाराची इतक्या उत्कृष्टपणे केलेली व्यवस्था, विविध वनस्पती, विविध वृक्ष, विविध पानाफुलांनी भरलेल्या वेली या सर्वांमुळे तेथील वातावरण रमणीय आणि आल्हाददायक झाले आहे. तेथे गेलेल्या व्यक्तीला एका असीम शांततेचा अनुभव येतो. त्या आश्रमाला दिलेले 'शांतीकुंज' हे नाव किती यथार्थ आहे हे मनोमन पटते.

गायत्री शक्तीपीठात असलेली अखंड ज्योती आपल्या अंतःकरणात भक्तीची ज्योत पेटवते. 1926 सालापासून ही अखंड ज्योत मानवी आत्म्याचे प्रतीक आहे. ही ज्योत अशीच अखंड तेवत ठेवण्याची नैतिक जबाबदारी शक्तीपीठाने घेतली आहे. 'देवात्मा हिमालय' चे एक उत्कृष्ट दालन शांतिकुंज मध्ये आपणास पहावयास मिळते. नाव किती सुंदर 'देवात्मा हिमालय'. असे म्हणतात, थिओसोफिकल सोसायटीच्या रशियाच्या 'मादाम ब्लावाटस्की' यांच्या हिमालयाच्या भ्रमंतीत आलेला अनुभव अद्भुत असा आहे. एका पुस्तकात त्यांनी तो लिहून ठेवला आहे. तो असा - " हिमालयाच्या एका गुहेत अनेक ऋषीमुनी पहाटेच्या वेळी म्हणजे ब्रह्म मुहूर्तावर गोलाकार बसून एका सुरात गायत्री मंत्राची साधना करताना त्यांना दिसले. त्या सर्वांचा एकत्रित दिव्य आवाज वातावरणात छान पसरत वर वर चालला होता. ती सारी शुचिर्भूत मंडळी, त्यांची साधना, मंत्राचे समूह गान, त्यातून बाहेर पडलेली ध्वनीची स्पंदने, सारे वातावरण मंगलमय आणि शुचिर्भूत करीत होती." हा दिव्य अनुभव आपल्याला भारतात हिमालयाच्या कुशीत घेता आला याची कृतज्ञता त्यांनी व्यक्त केलेली आहे. असा देवात्मा हिमालय! त्याची भव्यता, दिव्यता आणि उत्तुंगता सर्वांना कळावी म्हणून हे दालन हिमालयाची प्रतिकृती निर्माण करून सजवले आहे.

शांतीकुंजाची निर्मिती परमपूज्य श्री गुरुदेव यांनी विशिष्ट उद्देशाने केली आहे. मानवाचा महामानव व्हावा, नराचा नारायण व्हावा, मानवी जीवनातल्या अनेक गोष्टींनी निर्माण झालेला अंध:कार नष्ट व्हावा, मानवी जीवनाचे सार्थक व्हावे आणि नवीन अशा प्रेममय सुंदर जीवनाचे युग निर्माण व्हावे ही आंतरीक दुर्दम्य इच्छा होती. त्यांचे सद्गुरु ", ज्यांचे वास्तव्य सदैव हिमालयात. अशा गुरूंनी त्यांना पंधराव्या वर्षापासून मार्गदर्शन केले. त्यांच्या मार्गदर्शनानुसार चार वेळा हिमालयाची यात्रा केली. गायत्री मंत्राची 24 महापुरचरणे केली. एक पुर:चरण म्हणजे 24000 मंत्र. या साधना काळात गाईच्या शेणातून पडलेले जव संस्कारित करून त्याची रोटी आणि ताक असा आहार. याच काळात कुंडलिनीची सिद्धी साधना पूर्ण झाली.

युग निर्माण साठी व्यक्ती निर्माण, समाज निर्माण, राष्ट्र निर्माण आणि शेवटी योग निर्माण असा आराखडा तयार झाला. घराघरात गायत्री देवीची स्थापना व्हावी आणि प्रत्येक घरात गायत्री मंत्राची साधना व्हावी म्हणून हजारो कार्यकर्त्यांतर्फे प्रयत्न सुरू झाले.

परमपूज्य श्री गुरुदेव यांच्या या महान युग निर्माणाच्या कार्यात त्यांच्या पत्नी वंदनीय माताजींची अभूतपूर्व अशी साथ होती. जेव्हा श्री गुरुदेव तप:साधनेसाठी हिमालयात जायचे तेव्हा शांतीकुंजची संपूर्ण जबाबदारी अत्यंत

श्रद्धेने आणि निष्ठेने त्या पार पाडीत. वंदनीय माताजी खरोखर संपूर्ण गायत्री परिवाराची 'माऊली' होत्या. आज देश विदेशात दोन कोटी साधक असून प्रत्येक साधक निष्ठेने आणि श्रद्धेने परमपूज्य गुरुदेवांचे कार्य करीत आहे. नवे युग येणार नवा जमाना येणार, याची सर्वांना खात्री आहे.

अशा या नितांत रम्य शांतीकुंज हरिद्वारला, या अभूतपूर्व ठिकाणाला प्रत्येकाने भेट द्यावी व स्वतःच या दिव्य जागेचा, भूमीचा अनुभव घ्यावा. मला खात्री आहे की प्रत्येक व्यक्तीला मनोमन जाणवेल की खरोखर भारताची भूमी ही देवभूमी आहे.

- **संजीवनी मनोहर आठवले, पुणे**

चित्पावन आठवले कुलसंमेलन २०२३

नागाव येथील आठवले परिवाराने पुढाकार घेतल्यामुळे **नागाव येथे २५ व २६ फेब्रुवारी २०२३** रोजी आपले कुलसंमेलन घेण्याचे ठरविले आहे. प्राथमिक विचारांती कार्यक्रम साधारणपणे असा सुचविला आहे. यामध्ये जरुरीप्रमाणे बदल करण्यात येईल.

२५ फेब्रुवारी २०२३:

सर्वांनी दुपारी १२ वाजेपर्यंत नागावमध्ये पोहोचावे. कार्यक्रमस्थळी सर्वांचे एकत्रीकरण, एकमेकांची ओळख करून घेणे, दुपारचे स्नेहभोजन व एक सत्र. समुद्रकिनाऱ्यावर (ऐच्छिक) फेरफटका, चहा/कॉफी घेतल्यानंतर संध्याकाळी विविध गुणदर्शन व करमणुकीचे कार्यक्रम. नंतर रात्रीचे जेवण व आपापल्या लॉजवर मुक्काम.

२६ फेब्रुवारी २०२३:

सकाळचा नास्ता व चहा/कॉफी घेतल्यानंतर प्रत्यक्ष कुलसंमेलनाला सुरवात. त्यामध्ये दीपप्रज्वलन, परशुराम पूजन तसेच सरस्वती वंदन, विशेष निमंत्रित यांचा सत्कार, संस्थेच्या कार्याचा आढावा, उपक्रमांची माहिती तसेच पुढील वाटचालीबद्दल माहिती, मान्यवरांची प्रकट मुलाखत, अनुभव कथन व चर्चासत्र, "खुले व्यासपीठ" द्वारे प्रश्नोत्तरे इत्यादी. नंतर प्रमुख पाहुण्यांचे भाषण, आभारप्रदर्शन आणि समारोप. दुपारचे भोजन व नागावमधून दुपारी ४ नंतर प्रयाण.

नागाव मधील आठवले परिवाराने सर्व प्रतिनिधींची २५ तारखेस रात्री निवासाची व्यवस्था मोफत करण्याची जबाबदारी स्वीकारली आहे त्याबद्दल त्यांचे अभिनंदन. कुलसंमेलनानंतर पर्यटनासाठी राहू इच्छिणार्यांनी आपापल्या लॉज मालकांबरोबर चर्चा करून दर व व्यवस्था ठरवावी.

संमेलनानिमित्त 'सुसंवाद' ची एक संमेलन स्मरणिका पुरवणी काढण्याचा विचार आहे. उद्योजक अथवा सेवा पुरवणारे व्यावसायिक याना स्मरणिकेत सशुल्क जाहिरात देता येईल. तसेच संमेलनासाठी उदार दात्यांना त्यांच्या देणगीवर आयकर खात्याच्या कलम ८० ग प्रमाणे सूट मिळेल.

नागाव: रायगड जिल्ह्यातील अलिबाग पासून ७-८ कि.मी. वर नागाव हे समुद्र किनाऱ्यावरचे आणि पर्यटनासाठी प्रसिद्ध असे निसर्गरम्य ठिकाण आहे. नागावकर पारंपरिक व्यवसायाबरोबर आता पर्यटनासाठी विविध प्रकारची राहण्याची व जेवणाची सुविधा पुरवितात. समुद्रकिनाऱ्यावर विविध प्रकारचे साहसी वॉटर स्पोर्टस सुद्धा उपलब्ध आहेत. नारळी व पोफळीच्या नटलेल्या वाड्या आणि पुरातन मंदिरे हे नागावचे वैशिष्ट्य आहे. काही अंतरावर चौलचे दत्त मंदिर, देखणे बिर्ला मंदिर, मुरुडचा जंजिरा किल्ला, कणकेश्वरचे शिव मंदिर, मांडवा बंदर, अलिबाग /

किहीम / काशीद चे समुद्रकिनारे अशी अनेक पर्यटन स्थळे आहेत. मुंबईहून पेण मार्गे अलिबाग सुमारे १२५ कि.मी. अंतरावर तर पुण्याहून सुमारे १४० कि. मी. अंतरावर आहे.

कुलसंमेलनासाठी वर्गणीचे दर खालीलप्रमाणे

देणगीदार / तहहयात सदस्य / वार्षिक सदस्य: रु. 600 प्रति व्यक्ती
सदस्य नसलेले: रु.800 प्रति व्यक्ती
10 वर्षांखालील मुले: रु.300 प्रति बालक
वर्गणी शुल्कामध्ये २५ फेब्रुवारी रोजी नागाव येथे एक रात्र मुक्काम, तसेच २५ फेब्रुवारी २०२२ रोजी दुपारी १२ ते २६ फेब्रुवारी २०२२ रोजी दुपारी ३ वाजेपर्यंत नाश्ता/चहा/कॉफी/दुपारचे जेवण/रात्रीचे जेवण समाविष्ट आहे. HDFC बँक लिमिटेडच्या F. C. रोड पुणे येथील शाखेत चालू खाते क्रमांक 50200056690683 वर पेमेंट जमा केले जाऊ शकते. IFSC: HDFC0000103. खात्यात वर्गणीची रोख रक्कम अथवा चेक डिपॉझिट किंवा NEFT द्वारे भरावी.

तसेच लवकरात लवकर खालील लिंक आपल्या ब्राऊसरवर उघडून आपली माहिती कळवावी.

https://docs.google.com/forms/d/e/1FAIpQLSdOL1L-xGP9WjS0cMAC7c7m0TziDaTrfh0hksv-mhTSfwY4yQ/viewform?vc=0&c=0&w=1&flr=0&usp=mail_form_link

कुलसंमेलनासाठी वर्गणी ही संस्थेच्या बँक खात्यात भरल्यानंतर त्याचा तपशील chittpavan.athavale@gmail.com अथवा 98226 01805 / 9673007266 वर कळवावा.

- **श्रीकांत आठवले**
  उपाध्यक्ष